ॐ
श्रीविठ्ठल

काकड आरती संग्रह

संपादक
आनंद महाराज डगळे (आळंदी देवाची)
खिरविरे,ता.अकोले जि.नगर
मो.९९६०६२३०८९, ७०३८१९२३०६

पी.डी.एफ. निर्माता
आकाशराजनाथ
(संस्थापक, अध्यक्ष)
श्रवण भागवत प्रतिष्ठाण

अधिक माहितीसाठी या संकेतस्थळावर जा
www.akashrajnath.blogspot.com

संपर्क
+९१ ८९८३०१२८५४
पत्ता- श्री काळ भैरवनाथ मंदिर,
नाथ आश्रम, लातुर
महाराष्ट्र- ४१३५१२

ॐ

श्रीविठ्ठल

भीमातीरनिवासाय पंढरपुरवासिने।
पांडुरंगप्रकाशाय विठ्ठलाय नमोनमः॥

॥ श्री पाण्डुरङ्गाष्टकम्॥

महायोगपीठे तटे भीमरथ्यां।
वरं पुण्डरीकाय दातुं मुनीन्द्रैः॥
समागत्यतिष्ठन्तमानन्दकन्दं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥१॥

तडिद्वाससं नीलमेघावभासं।
रमामन्दिरं सुन्दरं चित्प्रकाशम्॥
वरं त्विष्टिकायां समन्यस्तपादं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥२॥

प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां।
नितम्बःकराभ्यां धृतौ येन तस्मात्॥
विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥३ ॥

स्फुरत्कौस्तुभालं कृतं कंठदेशे।
श्रियाजुष्टकेयूरकं श्रीनिवासम्॥
शिवं शान्तमीड्यं वरं लोकपालं
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥४॥

शरच्चन्द्रबिम्बाननं चारूहासं।
लसत्कुण्डक्रान्त गण्डस्थलाङ्गम्॥
जपारागबिम्बाधरं कंजनेत्रं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥५॥

किरीटोज्वलत्सर्वदिक्प्रान्तभागं।
सुरैरर्चितं दिव्यरत्नैरनर्घ्यैः॥
त्रिभङ्गाकृतिं बर्हमाल्यावतंसं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥६॥

विभुवेणुनादं चरन्तं दुरन्तम।
स्वयंलीलया गोपवेषं दधानम्॥
गवां वृन्दकानन्दनं चारूहासं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥७॥

अजं रूक्मिणी प्राणसञ्जीवनं तं।
परंधाम कैवल्यमेकं तुरीयम्॥
प्रसन्नं प्रपन्नार्तिहं देवदेवं।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम्॥८॥

॥श्री विठ्ठल॥

काकड आरती भजनी मालिका

॥मंगलाचरण पहिले॥ अभंग संख्या १३

॥राम कृष्ण हरि जय जय राम कृष्ण हरि॥

(१)
[१] रुप पाहता लोचनी। सुख झालें वो साजणी॥१॥
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा॥धृ॥
बहुता सुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठलीं आवडी॥३॥
सर्व सुखाचे आगर। बापरखुमादेवीवर॥४॥
(२)
[२] आरंभी आवडी आदरे आले नाम। तेणे सकळ सिद्धी जगी झाले पुर्ण काम॥१॥
रामकृष्ण गोविंद गोपाळा। तु माय माऊली जीवी जिव्हाळा॥धृ॥
तुझीयेनी नामे सकळ संदेह फिटला। बापरखुमादेवीवरा श्रीविठ्ठला॥३॥
(३)
[३] रुपीं जडले लोचन। पायीं स्थिरावले मन॥१॥
देहभाव हरपला। तुज पाहतां विठ्ठला॥धृ॥
कळो नये सुखदुःख। तहान हरपली भूक॥३॥
तुका म्हणे नव्हे परती। तुझ्या दर्शने मागुती॥४॥
(४)
[४] राहो आता हेंचि ध्यान। डोळा मन लंपट॥१॥
कोंड कोंडुनी धरीन जीवे। देहभावे पुजीन॥धृ॥
होईल येणें कळसा आले। स्थिरावले अंतरी॥३॥
तुका म्हणे गोजिरिया। विठोबा पाया पडो द्या॥४॥
(५)
[५] ऐकें वचन कमळापती। मज रंकाची विनंती॥१॥
कर जोडीतो कथेकाळी। आपण असावे जवळी॥धृ॥
घेई ऐसी भाक। मागेन जरी कांहीं एक॥३॥
तुकयाबंधु म्हणे देवा। शब्द इतुकाचि राखावा॥४॥
(६)
[६] तुज पाहता सामोरी।दृष्टि न फिरे माघारी॥१॥
माझ्या चित्ता तुझ्या पायां। मिठी पडली पंढरीराया॥धृ॥
नव्हे सारितां निराळें। लवण मेळवितां जळें॥३॥
तुका म्हणे बळी। जीव दिला पायातळी॥४॥

(७)

[७] तुम्ही सनकादिक संत। म्हणविता कृपावंत॥१॥
एवढा करा उपकार। देवा सांगा नमस्कार॥धृ॥
भाकावी करूणा। विनवा पंढरीचा राणा॥३॥
तुका म्हणे मज आठवा। मूळ लवकरी पाठवा॥४॥

(८)

[८] आता तुम्ही कृपावंत। साधु संत जीवलग॥१॥
गोमटें तें करा माझें। भार ओझें तुम्हांसी॥धृ॥
वंचिलें तें पायापाशीं। नाहीं यासी वेगळे॥३॥
तुका म्हणे सोडिल्या गांठी। दिली मिठी पायांसी॥४।

(९)

[९] लेंकुराचें हित। वाहे माऊलीचे चित्त॥१॥
ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती॥धृ॥
पोटीं भार वाहे। त्याचें सर्वस्वही साहे॥३॥
तुका म्हणे माझें। तुम्हा संतांवरी ओझे॥४॥

(१०)

[१०] करूनी उचित। प्रेम घाली ह्रदयात॥१॥
आलों दान मागायास। थोर करूनियां आस॥धृ॥
चिंतनसमयीं। सेवा आपुलीच देई॥३॥
तुकयाबंधु म्हणे भावा। मज निरवावें देवा॥४॥

(११)

[११] न करी उदास। माझी पुरवावी आस॥१॥
ऐका ऐका नारायणा। माझी परीसा विज्ञापना॥धृ॥
मायबाप बंधुजन। तुंचि सोयरा सज्जन॥३॥
तुका म्हणे तुजविरहित। कोण करील माझे हित॥४॥

(१२)

[१२] गरूडाचे पायीं। ठेवीं वेळोवेळां डोई॥१॥
वेगीं आणावा तो हरि। मज दीनातें उद्धरी॥धृ॥
पाय लक्ष्मीच्या हातीं। म्हणोनि येतों काकुळती॥३॥
तुका म्हणें शेषा। जागे करा ह्रषीकेशा॥

(१३)

[१३] येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई॥१॥
भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणीचे गंगा॥धृ॥
इतुक्यासहित त्वां बा यावें। माझें रंगणी नाचावे॥३॥
माझा रंग तुझे गुणीं। म्हणे नामयाची जनी॥४॥

(१४)

[१४] जगी विठ्ठल रूक्मीणी। तुम्ही अखंड स्मरा ध्यानी॥१॥
मग सुखा काय उणे। झाले सोयरे त्रिभुवने॥धृ॥
साराचे जे सार। भवसिंधु उतरी पार॥३॥
मन ठेवूनी चरणी। म्हणे नामयाची जनी॥४॥

॥मंगलाचरण दुसरे॥ अभंग संख्या ११

(१५)

[१] उंचनीच कांहीं नेणे भगवंत। तिष्ठे भावभक्त देखोनिया ॥धृ॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी। दैत्याघरीं रक्षी प्रह्लादासी॥२॥
चर्म रंगूं लागे रोहिदासासंगें। कबिराचे मागें शेले विणी॥३॥
सजन कसाया विकूं लागे मांस। माळ्या सांवत्यास खुरपूं लागे॥४॥
नरहरि सोनारा घडूं फुंकूं लागे। चोखामेळ्यासंगें ढोरें ओढी॥५॥
नामयाची जनी सवें वेंची शेणी। धर्माघरीं पाणी वाहे झाडी॥६॥
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित। ज्ञानियाची भिंत अंगे ओढी॥७॥
अर्जुनाचे रथीं होय हा सारथी। भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे॥८॥
गौळियांचें घरीं अंगें गाई वळी। द्वारपाळ बळीद्वारीं झाला॥९॥
येकोबाचें ऋण फेडी ह्रषीकेशी। अंबऋषीचे सोशी गर्भवास॥१०॥
मीराबाईसाठीं घेतो विष प्याला। दामाजीचा झाला पाडिवार॥११॥
घडीं माती वाहे गोऱ्या कुंभाराची। हुंडी त्या मेहत्याची अंगें भरी॥१२॥
पुंडलिकासाठीं अझूनी तिष्ठत। तुका म्हणे मात धन्य त्याची॥१३॥

(१६)

[२] श्रवणें कीर्तनें झाले ते पावन। सनकादिक जाण परम भक्त॥१॥
झाली ते विश्रांति याचकां सकळां। जीवीं जीवनकळा श्रीमूर्तीरया॥धृ॥
पादसेवनें अक्रूर झाला ब्रह्मरूप। प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचे॥३॥
सख्यपणें अर्जुन नर नारायण। सृष्टि जनार्दन एकरूप॥४॥
दास्यत्व निकट हनुमंतें केलें। म्हणोनि देखिले रामचरण॥५॥
बळी आणि भीष्म प्रह्लाद नारद। विभीषणा वरद चंद्रार्क॥६॥
व्यास आणि वसिष्ठ वाल्मिकादिक। आणिक पुंडलिकादि शिरोमणी॥७॥
शुकादिक योगी रंगले श्रीरंगीं। परिक्षितीच्या अंगी ठसावले॥८॥
उद्धव यादव आणि ते गोपाळ। गोपिकांचे मेळ ब्रह्मरूप॥९॥
अनंत भक्तराशी तरले ते वानर। ज्ञानदेवा घर चिदानंदी॥१०॥

(१७)

[३] पवित्र तें कुळ पावन तो देश। जेथें हरिचे दास जन्म घेती॥१॥
कर्मधर्म त्यांचा झाला नारायण। त्यांचेनि पावन तिन्ही लोक॥धृ॥
वर्णाभिमानें कोण झाले पावन। ऐसे द्या सांगून मजपाशी॥३॥
अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनें। तयांचीं पुराणें भाट झाली॥४॥
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार। धागा हा चांभार रोहिदास॥५॥
कबीर मोमीन लतिफा मुसलमान। सेना न्हावी जाण विष्णुदास॥६॥
कान्होपात्रा खोदु पिंजारी तो दादु। भजनी अभेदु हरीचे पायीं॥७॥
चोखामेळा बंका जातीचे महार। त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी॥८॥
नामयाची जनी कोण तिचा भाव। जेवी पंढरीराव तियेसवें॥९॥
मैराळ जनक कोण कुळ त्याचें। महिमान तयाचें काय सांगो॥१०॥
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा। निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं॥११॥
तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ। तारिले पतित नेणों किती॥१२॥

(१८)

[४] फिरविले देऊळ जगामाजी ख्याती। नामदेवा हाती दुध प्याला॥१॥
भरियेली हुंडी नरसी मेहत्याची। धनाजी चाट्याची शेती पेरी॥२॥
मीराबाईसाठी प्याला तो विषाचा। लाख्या कोलाट्याचा ढोल पिटी॥३॥
कबीराचे मागे विणू लागे शेले। मुल उठविले कुंभाराचे॥४॥
आता तुम्ही दया करा पंढरीराया। तुका विनवी पाया वेळोवेळा॥५॥

(१९)

[५] स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझी॥१॥
नमिता ज्ञानदेवा पावलो विसावा। अंतरीचा हेवा विसरलो॥२॥
सुखाचा निधान तो माझा सोपान। विश्रांतीचे स्थान मुक्ताबाई॥३॥
चांगदेव माझ्या आनंदाचा तारू। सुखाचा सागरू वटेश्वर॥४॥
सुखाचा सागर विसोबा खेचर। नरहरि सोनार प्राण माझा॥५॥
आठविता नामा पावलो विश्रामा। मोक्षमार्गी आम्हा वाट झाली॥६॥
परिसा भागवत जीवा आवडता। गोरा आणि सावता सखे माझे॥७॥
जनजसवंत सुरदास संत। नित्य प्रणिपात वैष्णवासी॥८॥
वंदु भानुदास वैष्णवांचे कुळी। ज्यासी वनमाळी मागे पुढे॥९॥
बाळपणी जेणे भानु आराधिला। वंश निराविला देवराया॥१०॥
धन्य त्यांचा वंश धन्य त्यांचे कुळ। परब्रह्म केवळ त्यांचे वंशी॥११॥
एका जनार्दनी संताचे स्तवन। जनी जनार्दन नमियेला॥१२॥

(२०)

[६] पंढरीये माझे माहेर साजनी। ओविया कांडणी गाऊ गीती॥१॥
राही रखुमाई सत्यभामा माता। पांडुरंग पिता माहियेर॥२॥
उद्धव अक्रुर व्यास अंबरिषि। भाई नारदासी गौरवीन॥३॥
गरूड बंधु लडिवाळ पुंडलिक। यांचे कवतुक वाटे मज॥४॥
मज बहु गोत संत आणि महंत। नित्य आठवीत ओवियेसी॥५॥
निवृत्ती ज्ञानदेव सोपान चांगया। जीवलगा माझिया नामदेवा॥६॥
नागो जगमित्रा नरहरि सोनार। रोहिदास कबीरा सोईरिया॥७॥
परिसा भागवत सुरदास सावता। गाईन नेनता सकळिकासी॥८॥
चोखामेळा संत जिवाचे सोईरे। न पडे विसर यांचा घडी॥९॥
जीवीच्या जीवना एका जनार्दन। पाठक हा कान्हा मीराबाई॥१०॥
आणिकही संत महानुभव मुनी। सकळा चरणी जीव माझा॥११॥
आनंदे ओविया गाईन मी त्यासी। जाती पंढरीसी वारकरी॥१२॥
तुका म्हणे माझ्या बळिया बापमाय। हर्षे नांदे सये घराचारी॥१३॥

(२१)

[७] निवृत्ती शोभे मुकुटाकार। ज्ञाना सोपान वटेश्वर ॥१॥
विठु पंढरीये राणे। ल्यालें भक्तीची भुषणे ॥२॥
खेचर विसा जगमित्र नागा। कुंडले जोडा विठोबा जोगा॥३॥
बाहु शोभे बाहुवट। गोरा सांवता दिग्पाट॥४॥
कंठी जाणा एकविद। तो हा जोगा परमानंद॥५॥
गळा शोभे वैजयंती। तिस मुक्ताई म्हणती॥६॥
कटीसुत्र कटांवरी। तो हा जाणावा कबीर॥७॥
जानु जघन सरळ। ते ही कान्होपात्रा विशाळ॥८॥
दंतपक्ती झळाळ। तो हा कान्हया रसाळ॥९॥

चरणींच्या क्षुद्र घंटा। नामयाचा नारा विठा॥१०॥
नाम चरणीचा तोडर। परिसा रूळतो किंकर॥११॥
चरणी वीट निर्मळ। तो हा झाला चोखामेळ॥१२॥
चरणातळील उर्ध्वरेखा। झाला जनार्दन एका॥१३॥

(२२)

[८] पापताप दैन्य जाय उठाउठी। जालिया या भेटी हरिदासांची॥१॥
ऐसे बळ नाही आणिकांचे अंगी। तप तीर्थ जगी दान व्रत॥धृ॥
चरणींचे रज वंदी शुळपाणी। नाचती कीर्तनी ज्यांचे माथा॥३॥
भव तरावया उत्तम हे नाव। भिजो नेदी पाव हात काही॥४॥
तुका म्हणे मन झाले समाधान। देखिल्या चरण वैष्णवांचे॥५॥

(२३)

[९] पवित्र तो देह वाणी पुण्यवंत। जो वदे अच्युत सर्वकाळ॥१॥
तयाच्या चिंतने तरतील दोषी। जळतील राशी पातकांच्या॥धृ॥
देव इच्छी रज चरणीची माती। धावत चालती मागे मागे॥३॥
काय त्या उरले वेगळे आणिक। वैंकुठनायक जया कंठी॥४॥
तुका म्हणे देव भक्तांचा संगम। तेथे ओघ नाम त्रिवेणीचा॥५॥

(२४)

[१०] बहु उतावीळ भक्तीचिया काजा। होशी केशीराजा मायबापा॥१॥
तुझ्या पायीं मज झालासे विश्वास। म्हणोनियां आस मोकलिली॥धृ॥
ऋषि मुनि सिद्ध साधक अपार। कळला विचार त्यांसी तुझा॥३॥
नाहीं नाश तें सुख दिलें तयांस। झाले जे उदास सर्वभावें॥४॥
तुका म्हणे सुख न माय मानसीं। धरिले जीवेंसी पाय तुझे॥५॥

(२५)

[११] पुण्यवंत व्हावें। घेतां सज्जनांची नावें॥१॥
नेघे माझी वाचा तुटी। महालाभ फुकासाठी॥धृ॥
विश्रांतीचा ठाव। पायीं संतांचिया भाव॥३॥
तुका म्हणे पापें। जाती संतांचिया जपें॥४॥

॥मंगलाचरण तिसरे॥ अभंग संख्या १४

(२६)

[१] सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनियां॥१॥
तुळसीहार गळां कांसे पीतांबर। आवडे निरंतर हेंचि ध्यान॥धृ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं। कंठी कौस्तुभमणि विराजित॥३॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीने॥४॥

(२७)

[२] सदा माझे डोळे जडो तुझे मुर्ती। रखुमाईच्या पती सोयरिया॥१॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम। देईं मज प्रेम सर्वकाळ॥धृ॥
विठो माऊलीये हाचि वर देईं। संचरोनि राहीं ह्रदयामाजीं॥३॥
तुका म्हणे काहीं न मागें आणिक। तुझे पायीं सुख सर्व आहे॥४॥

(२८)

[३] आवडे हें रूप गोजिरें सगुण। पाहतां लोचन सुखावले॥१॥
आता दृष्टीपुढे ऐसाचि तूं राहे। जो मी तुज पाहें पांडुरंगा॥धृ॥
लांचाचले मन लागलीसे गोडी। तें जीवें न सोडी ऐसें झालें॥३॥
तुका म्हणे आम्ही मागावी लडिवाळी। पुरवावी आळी मायबापे॥४॥

(२९)

[४] झणीं दृष्टी लागो तुझ्या सगुणपणा। जेणें माझ्या मना बोध केला॥१॥
अनंत जन्मीचे विसरलो दुःख। पाहतां तुझे मुख पांडुरगा॥धृ॥
योगियांच्या ध्यानीं ध्यातां नातुडसी। तो तूं आम्हापाशीं मागें पुढें॥३॥
नामा म्हणे जीवें करीन निंबलोण। विटेसहीत चरण ओंवाळीन॥४॥

(३०)

[५] पाहतां श्रीमुख सुखावलें सुख। डोळियांची भूक न वजे माझ्या॥१॥
जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस। अमृत जयास फिकें पुढे॥धृ॥
श्रवणाची वाट चोखाळली शुद्ध। गेले भेदाभेद निवारोनी॥३॥
महामळें मन होतें जें गादलें। शुद्ध चोखाळले स्फटिक जैसे॥४॥
तुका म्हणे माझ्या जीवाचें जीवन। विठ्ठल निधान सापडले॥५॥

(३१)

[६] राजस सुकुमार मदनाचा पुतळा। रविशशिकळा लोपलिया॥१॥
कस्तुरी मळवट चंदनाची उटी। रूळे माळ कंठी वैजयंती॥धृ॥
मुकुट कुंडले श्रीमुख शोभले। सुखाचे ओतीलें सकळही॥३॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा। घननीळ सावळा बाईयांनो॥४॥
सकळही तुम्ही व्हागे एकीसवा। तुका म्हणे जीवा धीर नाही॥५॥

(३२)

[७] गरूडाचे वारिके कासें पीतांबर। सावळे मनोहर कैं देखेन॥१॥
बरविया बरवंटा घनमेघ सांवळा। वैजयंती माळा गळा शोभे॥धृ॥
माथा मुकुट कोटी सुर्याचा झल्लाळ। कौस्तूभ निर्मळ शोभे कंठी॥३॥
ओतीव श्रीमुख सुखाचे सकळ। वामांगी वेल्हाळ रखुमादेवी॥४॥
उद्धव अक्रुर उभे दोहींकडे। वर्णिती पवाडे सनकादिक॥५॥
तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा। तोचि माझा सखा पांडुरंगा॥६॥

(३३)

[८] रंगा येई वो ये रंगा येई वो ये। विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई॥धृ॥
येई वो वैकुंठवासिनी विठाई जगत्रयजननी। तुझा वेधु माझे मनी॥२॥
कटीकर विराजित मुकुट रत्नजडित। कासे कासिला पीतांबर तैसा येई का धावत॥३॥
विश्वरुप विश्वंभरे कमलनयन कमलाकरे। तुझे ध्यान लागो बापरखुमादेविवरे॥४॥

(३४)

[९] गुणा आला विटेवरी। पीतांबरधारी सुंदर जो॥१॥
डोळे कान त्याच्या ठायीं। मन पायी राहो हे॥धृ॥
निवारोनी जाय माया। ऐसी छाया जयाची॥३॥
तुका म्हणे समध्यान। हे चरण सुकुमार॥४॥

(३५)

[१०] अष्टांग योग न शिणिजे। यम नियम न कीजे रया॥१॥
वाचा गीत गाईजे वाचा गीत गाईजे। गांता वातां श्रवणी ऐकीजे रया॥धृ॥
गीता छंदे अंद डोलीजे। लीला विनोदे संसार तरिजे रया॥३॥
बापरखुमादेवीवरू विठ्ठलनामे। जोडे हा उपाय कीजे रया॥४॥

(३६)

[११] राम बरवा कृष्ण बरवा। सुंदर बरवा बाईयांनो॥१॥
केशव बरवा माधव बरवा। गोपाळ बरवा बाईयांनो॥धृ॥
बापरखुमादेवीवरू त्रिभुवनी गरूवा। विठ्ठल बरवा बाईयांनो॥३॥

(३७)

[१२] धनी न पुरे गुण गांता। रूप दृष्टीं न्याहाळीतां॥१॥
बरवा बरवा पांडुरंग। कांती सांवळि सुरंग॥धृ॥
सर्व मंगळाचे सार। मुख सिद्धीचें भांडार॥३॥
तुका म्हणे सुखा। अंतपार नाही लेखा॥४॥

(३८)

[१३] येणे मुखे तुझे वर्णी गुण नाम। तेचि मज प्रेम देई देवा॥१॥
डोळे भरोनिया पाहिन तुझे मुख। तेचि मज सुख देई देवा॥धृ॥
कान भरोनिया ऐकेन तुझी कीर्ति। ते मज विश्रांती देई देवा॥३॥
वाहे रंगी टाळी नाचेन उदास। हे देई हातास पाया सुख॥४॥
तुका म्हणे माझा सकळ देहभाव। आणिक नको ठाव चिंतू यासी॥५॥

(३९)

[१४] नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव। मी भक्त तु देव ऐसे करी॥१॥
दावी रूप मज गोपिकारमणा। ठेऊ दे चरणावरी माथा॥धृ॥
पाहोनि श्रीमुख देईन अलिंगन। जीवे निंबलोण उतरीन॥३॥
पुसता सांगेन हितगुज मात। बैसोनि एकांत सुखगोष्टी॥४॥
तुका म्हणे यासी न लावी उशीर। माझे अभ्यंतर जाणोनिया॥५॥

॥विठोबा रखुमाई जय जय विठोबा रखुमाई॥

काकड आरतीचे अभंग संख्या १९

(४०)

[१] उठा उठा प्रभात जाहली। चिंता श्रीविठ्ठल माऊली।
दीन जनांची साऊली। येई धावोनि स्मरताचि॥१॥
पंढरपुरी जे भीमा तटी। सुंदर मनोहर गोमटी।
दोन्ही कर ठेवोनि कटी। भेटीसाठी तिष्ठतसे॥धृ॥
किरिट कुंडले मंडित। श्रीमुख अति सुंदर शोभत।
गळा वैजयंती डुल्लत। हार मिरवत तुळशीचा॥३॥
सुरेख मुर्ति सगुण सावळी। कंठी कौस्तुभ एकावळी।
केशर उटी परिमळ आगळी।बुक्का भाळी विलसतसे॥४॥
पीत पीतांबर कसला कटी। अक्षय वीट चरण तळवटी।
सकळ सौंदर्य सुखाची पेटी। ह्रदयसंपुष्टी आठवा ते॥५॥
अतिप्रिय आवडे तुळशी बुक्का। तैसीच प्रीती करी भोळ्या भाविका।
नामा पद पंकज पादुका। शिरी मस्तकी वंदीतसे॥६॥

(४१)

[२] उठा जागे व्हा रे आतां। स्मरण करा पंढरीनाथा।
भावे चरणी ठेवा माथा। चुकवी व्यथा जन्माच्या॥१॥
धन दारा पुत्र जन। बंधु सोयरे पिशुन।
सर्व मिथ्या हें जाणून। शरण रिघा देवासी॥धृ॥
माया विघ्नें भ्रमलां खरे। म्हणतां मी माझेनि घरें।
हें तों संपत्तीचें वारे। साचोकारें जाईल॥३॥
आयुष्य जात आहे पहा। काळ जपतसे महा।
स्वहिताचा घोर वहा। ध्यानीं रहा श्रीहरिच्या॥४॥
संत चरणीं भाव धरा। क्षणक्षणा नाम स्मरा।
मुक्ति सायुज्यता वरा। हेंचि करा बापांनो॥५॥
विष्णुदास विनवी नामा। भुलूं नका भवकामा।
धरा अंतरी निज प्रेमा। न चुका नेमा हरिभक्ती॥६॥

(४२)

[३] उठा उठा साधुसंत। साधा आपुलें हित।
गेला हा नरदेह। मग कैचा भगवंत॥धृ॥
उठुनी वेगेसी। चला जाऊं राऊळासी।
जळती पातकांच्या राशी। काकड आरती देखिलिया॥२॥
उठोनियां पहाटे। विठ्ठल पहा उभा विटे।
चरण तयाचे गोमटे। अमृत दृष्टी अवलोका॥३॥
जागे करा रूक्मिणीवरा। देव आहे निदसुरा।
वेगें लिंबलोण करा। दृष्ट होईल तयासी॥४॥
पुढें वाजंत्री वाजती। ढोल दमामे गर्जती।
होते काकड आरती। पांडूरंग रायासी॥५॥
सिंह नाद शंख भेरी। गजर होतो महाद्वारी।
केशवराज विटेवरी। नामा चरण वंदितो॥६॥

(४३)

[४] उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा। झाला अरूणोदय सरली निद्रेची वेळा॥१॥
संत साधु मुनी अवघे झालेती गोळा। सोडा शेजसुख आता पाहू द्या मुखकमळा॥धृ॥
रंगमंडपी महाद्वारी झालीसे दाटी। मन उतावीळ रूप पहावया दृष्टी॥३॥
राही रखुमाबाई तुम्हा येऊ द्या दया। शेजे हालवुनी जागे करा देवराया॥४॥
गरूड हनुमंत पुढे पाहाती वाट। स्वर्गीचे सुरवर घेऊनि आले बोभाट॥५॥
झाले मुक्त द्वार लाभ झाला रोकडा। विष्णुदास नामा उभा घेऊनि काकडा॥६॥

(४४)

[५] उठा अरूणोदय प्रकाश झाला। घंटा गजर गर्जीन्नला।
हरि चौघडा सुरू झाला। काकड आरती समयाचा॥१॥
महाद्वारी वैष्णवजन। पुजा सामुग्री घेऊन।
आले द्यावे तयांसी दर्शन। बंदीजन गर्जती॥धृ॥
सभामंडपी कीर्तन घोष। मृदंग टाळ विणे सुरस।
आनंदे गाती हरिचे दास। परम उल्हासे करोनिया॥३॥
चंद्रभादे वाळवंटी। प्रातः स्नानाची जन दाटी।
आता येतील आपुले भेटी। उठी उठी गोविंदा॥४॥
ऐसे विनवी रूक्मिणी। जागृत झाले चक्रपाणी।

नामा बद्धांजळी जोडोनी। चरणी माथा ठेवितसे॥५॥

(४५)

[६] उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला। वैष्णवांचा मेळा गरूडपारी दाटला॥१॥
वाळवंटापासूनि महाद्वारापर्यंत। सुरवरांची मांदी उभे जोडोनि हात॥धृ॥
शुकसनकादिक नारद तुंबर भक्ताच्या कोटी। कवाडा आडुनि पाहताती जग जेठी॥३॥
सुरवरांची विमाने गगनी दाटली सकळ। रखुमाबाई माते वेगी उठवा घननीळ॥४॥
रंभादिक नाचती उभ्या जोडोनि हात। त्रिशुळ डमरू घेऊनि आला गिरिजेचा कांत॥५॥
पंचप्राण आरत्या घेऊनिया देवश्रिया येती। भावे ओवाळीती राही रखुमाईचा पती॥६॥
अनंत अवतार घेसी भक्ताकारणे। कनवाळु कृपाळू दीनालागी उद्धरणे॥७॥
चौयुगाचा भक्त नामा उभा किर्तनी। पाठीमागे डोळे लाऊनी उभी ती जनी॥८॥

(४६)

[७] अवघे हरिजन मिळोनि आले राऊळा। दोन्ही कर जोडोनि विनविती गोपाळा॥१॥
उठा पांडुरंगा हरि जना संभाळी। पाहु द्या वदन वंदू पायाची धूळी॥धृ॥
उगवला दिनकर झाल्या निवळस दिशा। कोठवरी निद्रा आता उठा परेशा॥३॥
तुका म्हणे आम्ही उभे तिष्ठत द्वाराशी। दोन्ही कर जोडोनि गाई गोपाळ सेवेसी॥४॥

(४७)

[८] काहो तुम्ही निश्चिंतीने निजलाती हरि। मानियेले दुःख आम्ही वाचू कैशापरी॥१॥
उठा सावध व्हावे क्षेम सकळा द्यावे। जया जी वासना तया तैसे पुरवावे॥धृ॥
जन्मोजन्मी सांभाळीले क्षमा करा अन्याय। कृपा करी गा आम्हा तुचि बापमाय॥३॥
तुका म्हणे करा वडीलपणा दानासी। जेणे सुख होईल सकळ हे जनासी॥४॥

(४८)

[९] उठा सकळ जन उठले नारायण। आनंदले मुनिजन तिन्ही लोक॥१॥
करा जय जयकार वाद्यांचे गजर। मृदुंगविणे अपार टाळ घोळ॥धृ॥
जोडोनिया कर मुख पहा सादर। पायावरी शिर ठेवुनिया॥३॥
तुका म्हणे काय पढियंते मागा। आपुलाले सांगा सुख दुःख॥४॥

(४९)

[१०] भक्तीचिया पोटी बोध काकडा ज्योती। पंचप्राण जिवे भावे ओवाळु आरती॥१॥
ओवाळू आरती माझ्या पंढरीनाथा। दोन्ही कर जोडोनि चरणी ठेवितो माथा ॥धृ॥
काय महिमा वर्णू आता सांगणे ते किती। कोटी ब्रह्महत्या मुख पाहता जाती॥३॥
राही रखुमाबाई उभ्या दोन्ही दो बाही। मयुर पिच्छ चामरे ढाळती ठायीची ठायी॥४॥
तुका म्हणे दीप घेऊनि उन्मनी ती शोभा। विटेवरी उभा दिसे लावणयगाभा॥५॥

(५०)

[११] कनकाच्या परियेळी उजळुनी आरती। रत्नदीपप्रभा कैशा पाजळल्या ज्योती॥१॥
ओवाळू गे माये सबाह्य साजिरा। राही रखुमाबाई सत्यभामेच्या वरा॥धृ॥
मंडित चतुर्भुज दिव्य कानी कुंडले। श्रीमुखाची शोभा पाहता तेज फाकले॥३॥
वैजयंती माळ गळा शोभे श्रीमंत। शंखचक्र गदापद्म आयुधे शोभत॥४॥
सावळा सुकुमार जैसा कर्दळी गाभा। चरणीची नेपुरे वांकी गर्जती नभा॥५॥
ओवाळीता मन हे उभे ठाकले ठायी। समदृष्टी समान तुकया लागला पायी॥६॥

(५१)

[१२] तपे तीर्थ व्रते जया पायी मिरवती। संत मुनीवृंदे जया सुखाची लाधती॥१॥
हरिच्या पायालागी आरती करू। कायावाचामने चरण दृढ धरू॥धृ॥
सुरासुर उभे नमना कर जोडोनी। प्रह्लाद नारद अखंड जयाचे ध्यानी॥३॥
एकाएकी विनटला जनार्दन पायी। आरती करीता देही देहभाव नाही॥४॥

(५२)

[१३] संत सनकादिक भक्त मिळाले आणिक। स्वानंदे गर्जती पाहू आले कौतुक॥१॥
नवल होत आहे आरती देवाधिदेवा। स्वर्गीहुनी सुरवर पाहू येती केशवा॥धृ॥
नरनारी बाळा टक पडियले नयनां। ओवाळिता श्रीमुख धनी न पुरे मना॥३॥
एका जनार्दनी मंगळ आरत्या गाती। मिळाले वैष्णव जयजयकारे गर्जती॥४॥

(५३)

[१४] सहस्त्र दीपे दीप कैसी प्रकाशली प्रभा। उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा॥१॥
काकड आरती माझ्या कृष्ण सभागिया। चराचर मोहरले तुझी मुर्ती पहावया॥धृ॥
कोंदलेसे तेज प्रभा झालीसे एक। नित्य नवा आनंद ओवाळीता श्रीमुख॥३॥
आरती करीता तेज प्रकाशले नयनी। तेणे तेजे मिनला एकाएकी जनार्दनी॥४॥

(५४)

[१५] लाजले गे माये आता कोणा ओवाळू। जिकडे पहावे तिकडे चतुर्भुज गोपाळु॥धृ॥
ओवाळू मी गेले माय गेले द्वारके। जिकडे पहावे तिकडे चतुर्भुज सारिखे॥२॥
ओवाळू मी गेले माय सखिया माझारी। जिकडे पहावे तिकडे चतुर्भुज नरनारी॥३॥
ओवाळू मी गेले माय शारंगधरा। जिकडे पहावे तिकडे चतुर्भुज परिवारा॥४॥
वैजयंती माळ गळा श्रीवत्सलाञ्छन। विष्णुदास नामा येणे दाविली खुण॥५॥

(५५)

[१६] अवताराची राशी तो हा उभा विटेवरी। शंख चक्र गदा पद्मसहित करी॥१॥
देखिला देखिला देवा आदि देव बरवा। समाधान जीवा पाहता वाटे गे माये॥धृ॥
सगुण चतुर्भुज रूपडे तेज पुंजाळती। वंदोनि चरणरज नामा विनवी तसे पुढती॥३॥

(५६)

[१७] तुझिये निढळी कोटि चंद्र प्रकाशे। कमलनयन हास्यवदन हासे॥१॥
हाल का रे कृष्णा डोल का रे। घडिये घडिये घडिये गुज बोल का रे॥धृ॥
उभा रांहोनिया कैसा हालवितो बाहो। बापरखुमादेवीवरू विठ्ठल नाहो॥३॥

(५७)

[१८] गाऊं नाचु विठो तुझा करू अनुवाद। जिकडे पाहे तिकडे सर्वमय गोविंद॥१॥
आनंद रे विठोबा झाला माझे मनी। देखिली लोचनी विटेसहित पाऊले॥धृ॥
न करी तप साधन मुक्तीचे सायास। न हाचि जन्मोजन्मी गोड भक्तीचा रस॥३॥
तुका म्हणे आम्हा प्रेमा उठो ते काई। पंढरीचा राणा सांठविला ह्रदयी॥४॥

(५८)

[१९] सत्यज्ञानानंद गगनाचे प्रावर्ण। नाही रूप वर्ण गुण जेथे॥१॥
तो हा रे श्रीहरि पाहिला डोळे भरी। पाहातां पाहाणें दुरी सारोनिया॥धृ॥
ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निजज्योती। ते हे उभी मुर्ती विटेवरी॥३॥

॥भजन॥
।विठोबा रखुमाई जय जय विठोबा रखुमाई।

॥भुपाळ्यांचे अभंग॥ अभंग संख्या १३

(५९)

[१] योगिया दुर्लभ तो म्या देखिला साजणी। पाहतां पाहतां मना न पुरे धनी॥१॥
देखिला देखिला माये देवांचा देवो। फिटला संदेहो निमाले दुजेपण॥धृ॥
अनंतरुपे अनंतवेषे देखिले म्या त्यासी। बापरखुमादेवीवरू खूण बाणली कैसी॥३॥

(६०)

[२] करूनी विनवणी पायी ठेवितो माथा। परिसावी विनंती माझी पंढरीनाथा॥१॥
अखंडित असावे ऐसे वाटते पायी। साहोनी संकोच ठाव थोडासा देई॥धृ॥
असो नको भाव आलो तुझीया ठाया। कृपादृष्टी पाहे मजकडे पंढरीराया॥३॥
तुका म्हणे तुझी आम्ही वेडी वाकुडी। नामे भवपाश हाते आपुल्या तोडी॥४॥

(६१)

[३] माझे चित्त तुझे पायी। राहे ऐसे करी काही।
धरोनिया बाही। भव हा तारी दातारा॥१॥
चतुरा तु शिरोमणी। गुण लावण्याची खाणी।
मुकुट सकळामणी। धन्य तुचि विठोबा॥धृ॥
करी या तिमिराचा नाश। उदय होऊनी प्रकाश।
तोडी आशापाश। करी वास ह्रदयी॥३॥
पाहे गुंतलो नेणता। माझी असो तुम्हा चिंता।
तुका ठेवी माथा। साष्टांग हे चरणावरी॥४॥

(६२)

[४] ऐसी वाट पाहे काही निरोप का मुळ। का हो कळवळा तुम्हा उमटेचिना॥१॥
अहो पांडुरंगे पंढरीचे निवासे। लावुनिया आसे चाळवुनि ठेविले॥धृ॥
काय जन्मा येवोनिया केली म्या जोडी। ऐसे घडोघडी चित्ता येते आठवु॥३॥
तुका म्हणे खरा न पवेचि विभाग। धिक्कारिते जग हाचि लाहे हिशोब॥४॥

(६३)

[५] बोलोनिया दाऊ कां तुम्ही नेणा जी देवा। ठेवाल ते ठेवा ठायी तैसा राहेन॥१॥
पांगुळले मन काही नाठवे उपाय। म्हणवूनी पाय जीवी धरूनी राहिलो॥धृ॥
त्यागे भोगे दुःख काय सांडावे मांडावे। ऐसी धरियेली जीवे माझ्या थोर आशंका॥३॥
तुका म्हणे माते बाळ चुकलिया वनी। न पवता जननी दुःख पावे विठ्ठला॥४॥

(६४)

[६] कां गा केविलवाणा केलो दीनाचा दीन। काय तुझी हीन शक्ती झालीसे दिसे॥१॥
लाज येते मना तुझा म्हणविता दास। गोडी नाही रस बोलिलीया सारिखी॥धृ॥
लाजविली मागे संताची ही उत्तरे। कळो येते खरे दुजे एकावरूनी॥३॥
तुका म्हणे माझी कोणी वदविली वाणी। प्रसादावाचुनी तुमचिया विठ्ठला॥४॥

(६५)

[७] जळो माझे कर्म वाया गेली कटकट। झाले तैसे तट नाही आले अनुभवा॥१॥
आता पुढे धीर काय देऊ या मना। ऐसे नारायणा प्रेरिले ते पाहिजे॥धृ॥
गुणवंत केलो दोष जाणायासाठी। माझे मज पोटी बळकट दुषण॥३॥
तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा। बरवा हा लळा पाळियेला शेवटी॥४॥

(६६)

[८] जळोत ती येथे उपजविती अंतराय। सायासाची जोडी माझी तुमचे पाय॥१॥
आता मज साह्य येथे करावे देवा। तुझी घेई सेवा सकळ गोवा उगवोनी॥धृ॥
भोगे रोगा जोडोनिया दिले आणिका। अरूचि ते हों का आता सकळापासुनी॥३॥
तुका म्हणे असो तुझे तुज मस्तकी। नाही लौकिकी आता मज वर्तणे॥४॥

(६७)

[९] न सांगता तुम्हा कळो येते अंतर। विश्वी विश्वंभर परिहारचि न लगे॥१॥
परि हे अनावर आवरीता आवडी। अवसान ते घडी पुरो एकी देत नाही॥धृ॥
काय उणे मज येथे ठेवियेले ठायी। पोटा आलो तईपासुनिया समर्थे॥३॥
तुका म्हणे अवघी आवरीली वासना। आता नारायणा दुसरियापासुनी॥४॥

(६८)

[१०] तुजसवे आम्ही अनुसरलो अबळा। नको अंगी कळा रहो हरि हीन देऊ॥१॥
सासुरवासा भितो जीव ओढे तुजपासी। आता दोही विशी लज्जा राखे आमुची॥धृ॥
न कळता संग झाला सहज खेळता। प्रवर्तली चिंता मागिलाची यावरी॥३॥
तुका म्हणे असता जैसे तैसे बरवे। वचन या भावे वेचुनिया विनटलो॥४॥

(६९)

[११] कामे नेले चित्त नेदी अवलोकु मुख। बहु वाटे दुःख फुटो पाहे ह्रदय॥१॥
का गा सासुरवासी मज केले भगवंता। आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाही॥धृ॥
प्रभातेसी वाटे तुमच्या यावे दर्शना। येथे न चले थोरी उरली राहे वासना॥३॥
येथे अवघे वाया गेले दिसती सायास। तुका म्हणे नाश दिसे झाल्या वेचांचा॥४॥

(७०)

[१२] तुझे दास्य करु आणिका मागो खावया। धिग झाले जिणे माझे पंढरीराया॥१॥
काय गा विठोबा तुज आता म्हणावे। शुभाशुभ गोड तुम्हा थोरांच्या नावे॥धृ॥
संसाराचा धाक निरंतर आम्हासी। मरण आले परि काय अवकळा ऐशी॥३॥
तुझा शरणागत शरण जाऊ आणिकासी। तुका म्हणे लाज कवणा हे का नेणसी॥४॥

(७१)

[१३] आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखिलिया॥१॥
भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंदु॥धृ॥
प्रेमरस बैसली मिठी। आवडी लाठी मुखासी॥३॥
तुका म्हणे आम्हा जोगे। विठ्ठल घोगे खरे माप॥४॥

॥भजन॥
॥ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम॥

पुजेची ओळ अभंग संख्या १५

(७२)

[१] ज्ञानियांचा गुरु राजा महाराव। म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे॥१॥
मज पामरा हे काय थोरपण। पायीची वहाण पायी बरी॥धृ॥
ब्रह्मादिक जेथे तुम्हा ओळंगणे। इतर तुळणे काय पुढे॥३॥
तुका म्हणे नेणो युक्तीची ते खोली। म्हणोनी ठेविली पायी डोई॥४॥

(७३)

[२] जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ। अंगी ऐसे बळ रेडा बोले॥१॥
करील ते काय नोहे महाराज। परी पाहे बीज शुद्ध अंगी॥धृ॥
जयाने घातली मुक्तीसी गवादी। मेळविली मांदी वैष्णवांची॥३॥
तुका म्हणे तेथे सुखा काय उणे। राहे समाधाने चित्ताचिया॥४॥

(७४)

[३] श्रीपंढरीशा पतित पावना। एक विज्ञापना पायापाशी॥१॥
अनाथ जीवांचा तु काज कैवारी। ऐसी चराचरी ब्रीदावळी॥धृ॥
न सांगता कळे अंतरीचे गुज। आता तुझी लाज तुज देवा॥३॥
आळिकर त्याचे करिसी समाधान। अभयाचे दान देऊनिया॥४॥
तुका म्हणे तुची खेळे दोन्ही ठायी। नसेल तो धीर देई मना॥५॥

(७५)

[४] अगा ये उदारा अगा विश्र्वंभरा। रखुमाईच्या वरा पांडुरंगा॥१॥
अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा। अगा मेघःश्यामा विश्र्वजनित्या॥धृ॥
अगा कृपावंता जीवन तु दाता। अगा सर्व सत्ता धरतीया॥३॥
अगा सर्व जाणा अगा नारायणा। करूणावचना चित्त द्यावे॥४॥
तुका म्हणे नाही अधिकार तैसी। सरती पायापाशी केली मागे॥५॥

(७६)

[५] नोहे दास खरा। परी हा झालासे डांगोरा॥१॥
यासी काय करू आता। तु हे सकळ जाणता॥धृ॥
नाही पुण्य गाठी। जे हे वेचू कोणासाठी॥३॥
तुका म्हणे का उपाधी। वाढविली कृपानिधी॥४॥

(७७)

[६] शंखचक्रगदाधरू। कासे सुरंग पीतांबरू। चरणी ब्रीदाचा तोडरू। असुरावरी काढितसे॥१॥
बरवा बरवा केशवराज। गरूडवाहन चतुर्भुज। कंठी कौस्तुभ झळके वीज। मेघःश्याम देखोनि॥धृ॥
करी सृष्टीची रचना। नाभी जन्म चतुरानना। जग हे वाखाणी मदना। ते लेकरु तयाचे॥३॥
कमळा विलासली पायी। आर्त तुळसीचे ठायी। ब्रह्मादिका अवसरू नाही। तो यशोदे ओसंगा॥४॥
उपमा द्यावी कवणे अंगा। चरणी जन्मली पै गंगा। सोळा सहस्त्र रमा संभोगा। नित्य न पुरती कामिनी॥५॥
अधिष्ठान गोदातीरी। ऋद्धिसिद्धि तिष्ठती द्वारी। भानुदास पुजा करी। वाक्पुष्पे अनुपम्य॥६॥

(७८)

[७] समर्पिली वाणी। पांडुरंगी घेते धनी॥१॥
पुजा होती मुक्ताफळी। रस ओविया मंगळी॥धृ॥
धार अखंडित। ओघ चालियेला नित्य॥३॥
पुर्णाहुती जीव। तुका घेऊनी ठेला भाव॥४॥

(७९)

[८] येथुनिया ठाव। अवघे लक्षयाचे भाव॥१॥
उंच देवाचे चरण। तेथे झाले अधिष्ठान॥धृ॥
आघातावेगळा। असे ठाव हा निराळा॥३॥
तुका म्हणे स्थळ। धरुनि राहिलो अचळ॥४॥

(८०)

[९] स्वामींचे हे देणे। येथे पावलो दर्शने॥१॥
करू आवडीने वाद। तुमच्या सुखाचा संवाद॥धृ॥
कळावया वर्म। हा तो पायाचाची धर्म॥३॥
तुका म्हणे सिद्धी। हेचि पावविली बुद्धी॥४॥

(८१)

[१०] कासयाने पुजा करू केशीराजा। हाचि संदेह माझा फेडी आता॥धृ॥
उदके न्हाणु तरी स्वरूप ते तुझे। तेथे काय माझे वेचे देवा॥२॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ। तेथे मी दुर्बळ काय करू॥३॥

फळ दाता तुचि तांबोल अक्षता। तेथे काय आता वाहो तुज॥४॥
वाहू दक्षिणा तरी धातू नारायण। ब्रह्म तोचि अन्न दुजे काही॥५॥
गाता तु ॐकार टाळी नादेश्वर। नाचावया थार नाही कोठे॥६॥
तुका म्हणे मज अवघे तुझे नाम। धुप दिप रामकृष्णहरि॥७॥

(८२)

[११] ज्याची खरी सेवा। त्याच्या भय काय जीवा॥१॥
करिता स्वामीसवे वाद। अधिक अधिक आनंद॥धृ॥
असावा तो धर्म। मग साहो जाते वर्म॥३॥
वदे वाग्देवी। तुका विठ्ठल गौरवी॥४॥

(८३)

[१२] आम्हा हरिच्या दासा काही। भय नाही त्रय लोकी॥१॥
देव उभा मागे पुढे। उगवी कोडे संकट॥धृ॥
जैसा केला तैसा होय। धावे सोय धरोनी॥३॥
तुका म्हणे असो सुखे। गाऊ मुखे विठोबा॥४॥

(८४)

[१३] सेवा ते आवडी उच्चारावे नाम। भेदाभेद काम निवारोनी॥१॥
न लगे हालावे चालावे बाहेरी। अवघेची घरी बैसलीया॥धृ॥
देवाचीच नामे देवाचीच शीरी। सर्व अळंकारी समर्पावी॥३॥
तुका म्हणे होय भावेचि संतोषी। वसे नामा पाशी आपुलिया॥४॥

(८५)

[१४] नाम गाऊ नाम ध्याऊ। नाम विठोबासी वाहू॥१॥
आम्ही दैवाचे दैवाचे। दास पंढरीरायाचे॥धृ॥
टाळ दिंडी घेऊनी हाती। विठ्ठल नाम गाऊ प्रीती॥३॥
नामा म्हणे लाखोली सदा। अनंत नामे वाहू गोविंदा॥४॥

(८६)

[१५] अवघ्या उपचारा। एक मनचि दातारा॥१॥
घ्यावी घ्यावी माझी सेवा। दीन दुर्बळाची देवा॥धृ॥
अवघियांचा ठाव। पायावरी जीवभाव॥३॥
चित्ताचे आसन। तुका करितो कीर्तन॥४॥

॥भजन॥
॥जय जय विठोबा रखुमाई॥

॥मालिका ७वी॥
(देवाच्या भेटीची आतुरतेने वाट पाहणे) अभंग संख्या १०

(८७)

[१] चित्ती तुझे पाय डोळा रुपाचे ध्यान। अखंड मुखी नाम तुमचे वर्णावे गुण॥१॥
हेचि एक देवा तुम्हा मागणे दातारा। उचित ते करा माझा भाव जाणोनी॥धृ॥
खुंटले जाणीव माझे बोलणे आता। कळो यावी तैसी करा बाळाची चिंता॥३॥
तुका म्हणे आता नको देऊ अंतर। न कळे पुढे काय बोलु विचार॥४॥

(८८)

[२] वाट पाहे बाहे निढळी ठेवूनिया हात। पंढरीचे वाटे दृष्टी लागलेसे चित्त॥१॥
कई येता देखेन माझा माय बाप। घटीका बोटे दिवस लेखी धरूनिया माप॥धृ॥
डावा डोळा लवतसे उजवी स्फुरतसे बाहे। मन उतावीळ भाव सांडुनिया देहे॥३॥
सुख सेज गोड चित्ती न लगे आणिक। नाठवे घरदार तहान पळाली भुक॥४॥
तुका म्हणे धन्य ऐसा दिवस तो कोण। पंढरीचे वाटे येता मुळ देखेन॥५॥

(८९)

[३] पैल विळाचिये विळ अंगणी उभी ठेलिये। येतिया जातिया पुसे विठ्ठल केऊता गे माये॥१॥
पायरऊ झाला संचारू नवल। वेधे विंदान लाविले म्हणे विठ्ठल विठ्ठल॥धृ॥
तेणे तहानभूक नाही लाज अभिमान। वेधिले जनार्दनी देवकीनंदनु गे माये॥३॥
बापरखुमादेवीवरू जीवीचा जीवनु। माझे मनीचे मनोरथ पुरवी कमळनयनु॥४॥

(९०)

[४] येतियासी पुसे जातिया धाडी निरोप। पंढरपुरी आहे माझा मायबाप॥१॥
येई वो येई वो विठाबाई माऊलीये। निढळावरी कर ठेऊनी वाट मी पाहे॥धृ॥
पीतांबर शेला कैसा गगनी झळकला। गरूडावरी बैसोनी माझा कैवारी आला॥३॥
विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिवाळी। विष्णुदास नामा जीवे भावे ओवाळी॥४॥

(९१)

[५] येई वो येई वो येई धावोनिया। विलंब का वाया लावियेला कृपाळे॥१॥
विठाबाई विश्र्वंभरे भवच्छेदके। कोठे गुंतलीस माये विश्र्वव्यापके॥धृ॥
न करी न करी आता आळस अव्हेरू। व्हावया प्रकट कैचे दुरी अंतरू॥३॥
नेघे नेघे नेघे माझी वाचा विसावा। तुका म्हणे हावा हावा हावा साधवा॥४॥

(९२)

[६] दुध पियो मोरे गोविंद लाला॥धृ॥
काला बछरा कपिला गाई। दुध दुहावत नामा जाई॥२॥
सोने का गडवा दुधने भरिया। पियो नारायण आगे धरिया॥३॥
प्रभु की मुरत दुध नही पीवत। सीर पछारत नामा रोवत॥४॥
ऐसा भगत मैं कबहु नही पाया। नामदेवने देव हसाया॥५॥

(९३)

[७] चक्री भोवरा विटी दांडु। रंगीत गोट्या बेगडा चेंडु। हरि तू खेळ॥१॥
हरि तू खाय बा साखर लोणीमाझिया बाळा॥धृ॥
बाळ मुकूंद खातो लोणी। कौतुक पाहे नंद राणी। भरूनी डोळा॥३॥
नव लक्ष गाई गडी। वाट पाहती यमुना धडी। घन नीळा॥४॥
भानुदास विनंती करी। प्रसाद द्यावा बा श्रीहरि। त्रिभुवन पाळा॥५॥

(९४)

[८] पडिले दुरदेशी मज आठवे मानसी। नको नको हा वियोग कष्ट होताती जीवासी॥१॥
दिन तैसी रजनी झाली गे माये। अवस्था लावूनी गेला अझूनी का नये॥धृ॥
गरूडवाहना गंभीरा येई दातारा। बापरखुमादेवीवरा श्रीविठ्ठला॥३॥

(९५)

[९] आर्त माझे पोटी दिवस लेखी बोटी। प्राण धरूनी कंठी वाट पाहे॥१॥
भेटसी केधवा माझिया जीवलगा। येई गा पांडुरंगा मायबापा॥धृ॥
चित्त निरंतर माझे महाद्वारी। अखंड पंढरी ह्रदयी वसे॥३॥
कटी कर विटे समचरण साजिरे। देखावया झुरे मन माझे॥४॥
श्रीमुख साजिरे कुंडले गोमटी। तेथे माझी दृष्टी बैसलीसे॥५॥

आसुवे दाटली उभारूनी बाहे। नामा वाट पाहे रात्रंदिवस॥६॥

(९६)

[१०] धन्य आजि दिन। झाले संताचे दर्शन॥१॥
झाली पापा तापा तुटी। दैन्य गेले उठाउठी॥धृ॥
झाले समाधान। पायी विसावले मन॥३॥
तुका म्हणे आले घरा। तोचि दिवाळी दसरा॥४॥

(९७)

[११] पंढरीसी जावे ऐसे माझे मनी। विठाई जननी भेटे केव्हा॥१॥
न लगे त्याविण सुखाचा सोहळा। लागे मज ज्वाळा अग्निचिया॥धृ॥
तुका म्हणे त्याचे पाहिलीया पाय। मग दुःख जाय सर्व माझे॥३॥

(९८)

[१२] संपदा सोहळा नावडे मनाला। करिते टकळा पंढरीचा॥१॥
जावे पंढरीसी आवडे मानसी। कधी एकादशी आषाढीये॥धृ॥
तुका म्हणे ऐसे आर्त ज्याचे मनी। त्याची चक्रपाणी वाट पाहे॥३॥

॥भजन॥
॥विठोबा रखुमाई जय जय विठोबा रखुमाई॥

॥वासुदेव॥

(९९)

[१] ओले मृत्तिकेचे मंदिर। आत सहा जण उंदीर।
गुंफा करिताती पोखर। याचा नका करू अंगीकार गा॥१॥
वासुदेव करीतो फेरा। तु अद्यापी का निदसुरा।
सावध होई रे गव्हारा। भज भज तु शारंगधरा गा॥धृ॥
बा तुझे तु सोयरे। तु चि वडिल बा धारे।
तु तूझेनि आधारे। वरकड मिळाले अवघे चोर गा॥३॥
वासुदेव फोडिती टाहो। उठी उठी लवलाहो।
हा दुर्लभ मानवदेहो। म्हणे तुकयाबंधु स्वहित लवलाहो गा॥४॥

(१००)

[२] उठ बा होय जागा पाहे वासुदेवाला। सुदिन उगवला दान आपुले घाला॥१॥
आणिक हिता गा आला अवचित फेरा। हे घडी सापडेना काही दान पुण्य करा॥धृ॥
ठेविल्या स्थिर नोहे घर सुकृते भर। भक्तासी भय नाही संत संगती धर॥३॥
संसार सार नोहे माया मृगजळ भासत। क्षणात भ्रांती यांचा काय विश्वास॥४॥
घे करी टाळ दिंडी हो या विठ्ठलाचा दास। सावधान नरहरि मालो चरणी निज दास॥५॥

श्री तुकोबारायांचे वासुदेव

(१०१)

[१] मनुराजा एक देहपुरी। असे नांदतु त्यासी दोघी नारी।
पुत्रपौत्र संपन्न भारी। तेणे कृपा केली आम्हावरी गा॥१॥
म्हणऊनी आलो या देशा। होतो नाही तरी भुललो दिशा।
दाता तो ही मज भेटला ईच्छा। येऊनि मार्ग दाविला सरिसा गा॥धृ॥
सवे घेऊनिया चौघेजण। आला सुकुमार सुलक्षण।

कडे चुकवुनी काटे वन। ऐका आणिली ती कोण कोण गा॥३॥
पुढे भक्तीने धरीले हाती। मागे ज्ञान वैराग्य धर्म येती।
स्थिर केली जी अचपळे होती। सिद्ध आणुनि लाविली पंथी गा॥४॥
केले उपकार सांगो काय। बाप न करी ऐसी माय।
धर्मेत्यांच्या देखियेले पाय। दिले अक्षय अभय दान॥५॥
होतो पीडित हिंडता गाव। पोट न भरे न राहावया ठाव।
तो येणे अवघा संदेह। म्हणे फेडियेला तुकयाचा बांधव गा॥६॥

(१०२)

[२] गातो वासुदेव मी ऐका। चित्त ठायी ठेवूनि भावे एका।
डोळे झाकुनी रात्र करू नका। काळ करीत बैसलासे लेखा गा॥१॥
राम राम स्मरा आधी। लाहो करा गाठ घाला मुळबंधी।
सांडा वाऊगिया उपाधी। लक्ष लावूनि राहा गोविंदी गा॥धृ॥
अल्प आयुष्य मानव देह। शत गणिले ते अर्ध रात्र खाय।
मध्ये बालत्व पीडा रोग क्षय। काय भजनासी उरले ते पाहे गा॥३॥
क्षणभंगुर नाही भरवसा। व्हारे सावध तोडा माया आशा।
काही न चले मग गळा पडेल फासा। पुढे हुशार थोर आहे ओळसा गा॥४॥
काही थोडा बहुत लागपाठी। करा भक्ति भाव धरा बळकट।
तन मन ध्यान दया लावुनिया नीट। जरी करणे असेल गोड शेवट गा॥५॥
विनवितो सकळा जना। कर जोडोनी थोरा लहाना।
दान इतुलेची द्या मज दीना। म्हणे तुकया बंधु राम राम म्हणा गा॥६॥

(१०३)

[३] गेले टळले पहर तीन। काय निदसुरा अझुन।
जागे होऊनि करा कांही दान। नका ऐको झाकुनि लोचन गा॥१॥
हरि राम कृष्णा। वासुदेव जाणवितसे जना।
चिपळ्या टाळ हाती विणा। मुखी घोष नारायणा गा॥धृ॥
जे ठाकेल कोणा काही। फळ पुष्प अथवा तोयी।
द्या परि मीस घेऊ नका भाई। पुढे विन्मुख होता बरें नाही गा॥३॥
देवाकारणे भाव तस्मात्। द्यावे न लगे फारसे वित्त।
झाले एकचित्त तरी बहुत। येवढ्यासाठी नका करू वाताहात गा॥४॥
आलो येथवरी बहु सायासे। करीता दान हेचि मागावयास।
नका भार घेऊ करूं निरास। धर्म सारफळ संसारास गा॥५॥
आता मागुता येईल फेरा। हे तो न घडे या नगरा।
म्हणे तुकयाबंधु राम धरा। ओळखी नाही तरी जाल मागारा गा॥६॥

(१०४)

[४] राम राम दोनी अक्षरे। सुलभ आणि सोपारे।
जागा मागिले पहारे। शेवटिचे गोड तेचि खरे गा॥१॥
राम कृष्ण वासुदेवा। जाणवीतसे जनासी।
वाजवी चिपळीया। टाळ घागऱ्याघोषें गा॥धृ॥
गाय वासुदेव वासुदेवा। भिन्न नाहीं आणिका नावा।
दान जाणोनिया करी हावा। न ठेवी उरी काही ठेवा गा॥३॥
नीज घेऊनिया फिरती। एक वेळ जाणविती।
धरूनिया राहा चित्ती। नेघे भार सांडी कामा हाती गा॥४॥
सुपात्री सर्व भाव। मी तो सर्व वासुदेव।

जाणती कृपाळु संत महानुभाव। जया भिन्न भेद नाही ठावा गा॥५॥
शुर दान जीवे उदार। नाही वासुदेवी विसर।
किर्ती वाढे चराचर। तुका म्हणे तया नमस्कार गा॥६॥

(१०५)

[५] बोल अबोलणे बोले। जागे बाहेर आत निजेले।
कैसे घरात घरकुल केले। नेणो अंधार ना उजेडले गा॥१॥
वासुदेव करितो फेरा। वाडियात बाहेर दारा।
कोणी काही तरी दान पुण्य करा। जाब नेदा तरी जातो माघारा गा।॥धृ॥
हाती टाळ दिंडी मुखी नाम गाणे। गजर होतो बहु मोठ्याने।
नाही निवडिली थोर लहाने। नका निजो भिकेच्या भेणे गा॥३॥
मी वासुदेव तत्त्वता। कळो येईल विचारिता।
आहे ठाऊका सभाग्य संता। नाही दुजा आणिक मागता गा॥४॥
काही जागा का निजलासी। सुने जागवूनि दारापाशी।
तुझ्या हितापाठी करी वसवसी। भेटी न घेसी वासुदेवासी गा॥५॥
ऐसे जागविले अवघे जन। होते संचित तिही केले दान।
तुका म्हणे दुबळी कोण कोण। गेली वासुदेवासी विसरून गा॥६॥

(१०६)

[६] राम कृष्ण गीती गात। टाळ चिपळ्या वाजवित।
छंदे आपुलिया नाचत। नीज घेऊनी फिरत गा॥१॥
जनी वनी अवघा देव। वासनेचा पुसावा ठाव।
मग वोळगा तो वासुदेव। ऐसा मनी वसू द्या भाव गा॥धृ॥
निज दानाची थोर आवडी। वासुदेवासी लागली गोडी।
मुखी नाम उच्चारी घडोघडी। ऐसी करा वासुदेवी जोडी गा॥३॥
अवघा सारूनी शेवट झाला। प्रयत्न न चले काही केला।
जागा होई सांडुनि झोपेला। दान देई वासुदेवाला गा॥४॥
तुका म्हणे धन्य त्यांचे जिणे। जिही वासुदेवी घातले दान।
त्या न लगे येणे जाणे। झाले वासुदेवी राहणे गा॥५॥

श्री एकनाथ महाराजांचे वासुदेव

(१०७)

[१] धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे। रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे॥धृ॥
सुखदुःखसमान सकळ जीवांचा कृपाळ। ज्ञानाचा उद्बोध भक्तिप्रेमाचा कल्लोळ॥२॥
विषयी विरक्त जया नाही आपपर। सर्वदा संतुष्ट स्वये व्यापक निर्धार॥३॥
जाणीव शहाणीव वोझे सांडोनिया दुरी। आपण वस्तीकर वर्ततसे संसारी॥४॥
एका जनार्दनी नित्य हरीचे कीर्तन। आसनी शयनी सदा हरीचे चिंतन॥५॥

(१०८)

[२] जया परमार्थी चाड। तेणे सांडावा लिगाड।
धरूनी भजनाची चाड। नित्य नेम आदरे॥१॥
सांडी मांडी परती टाकी। वासुदेव नाम घोकी।
मोक्ष येईल सुखी। नाम स्मरता आदरे॥धृ॥
रामकृष्ण वासुदेवा। धरि हाचि दृढ भावा।
आणिकांचा हेवा। दुरी करी आदरे॥३॥
घाली संतासी आसने। पुजा करी कायावाचामने।

एका जनार्दनी जाणे। इच्छिले ते पुरवी॥४॥

(१०९)

[३] सुखे सेऊं ब्रह्मानंदा। गाऊ रामनाम सदा।
नोहे मग बाधा। काळदुत यमाची॥१॥
करू वासूदेव स्मरण। तेणे तुटे रे बंधन।
खंडेल कर्माचे विंदान। वासुदेव जपताचि॥धृ॥
तीर्थयात्रे सुखे जाऊ। वाचे विठ्ठल नाम घेऊ।
संतासंगे सेऊ। वासुदेव धणिवरी॥३॥
लोभममता दवडू आशा। उदर व्यथेचा ओळसा।
न करू आणिक सायासा। वासुदेवावाचुनि॥४॥
मुख्य वर्माचे हे वर्म। येणे साधे सकळ धर्म।
एका जनार्दनी नाम। वासुदेवी आवडी॥५॥

(११०)

[४] वासुदेव स्मरणे तुटती जन्ममरणव्याधी। अहं सोहं कोहं मुळ ह्या सांडी उपाधी॥१॥
रामकृष्ण वासुदेव गोपाळ वाचे आठवा। जन्मजरा तुटे वाचे आठवित साठवा॥धृ॥
चिपळ्या टाळ घुळघुळा शब्द नादे। तेणे ब्रह्मानंद ह्रदयी आठवण नांदे॥३॥
एका जनार्दनी वासुदेव चिंतिता। यम काळदुत पळती नाम ऐकता॥४॥

(१११)

[५] विषय सेविता गा जन्ममरणाची बाधु। विवेक गुरूवाक्य छेदी भवबंधु॥१॥
रामकृष्ण वासुदेव हरि ब्रह्मानंदे गळती गा। रामकृष्ण वासुदेव हरि विदेही झाला गा॥धृ॥
गुरूवाक्य भावबळे निजबोधे पे बुद्धि। तेणे बोधे पाहाता गा अखंड ते समाधी॥३॥
जनी वनी निरंजनी वासुदेव समान। एका जनार्दनी चित्त चैतन्यघन॥४॥

(११२)

[६] वासुदेव स्मरण पापहरणाचे मुळ। तीर्थाचे माहेर ब्रह्मव्यापक निश्चळ।
अघनासी मुखी स्मरता वाचा झाली निर्मळ। त्रिविधताप शोषुनी रूपी स्वरूपी सुमंगळ॥१॥
ॐ नमो भगवते रामकृष्ण वासुदेवा॥धृ॥
जपतप अनुष्ठान व्यर्थ कासया करणे। तीर्थव्रत यमनेम न लगे दैवता धरणे।
आसन मुद्रा ज्ञान ध्यान न लगे वाराणसी मरणे। केशव माधव अच्युत वदता होय पातक हरणे॥३॥
शरीर शोषण प्राण निरौधन मनोजय हठयोग। गुदपीडन कुंडलीनी कलीमलदलभंग।
उर्ध्व वायुचा श्वेतु तोडोनि करी वो वनभंग। ब्रह्मरंध्री मिसळे परि मुमुक्षु दंग॥४॥
मनोजय वासना तोडोनी केली बिमोडी। मनपुर नगर पाहता दुर्गती मोडी।
काम क्रोध मद मत्सर दंभ अहंकार झोडी। अखंड परमार्थ सेऊनि उभवी गुढी॥५॥
भेदभाव तोडोनी घेतला प्रेमाचा गरळा। शुद्ध नाम श्रीहरीचे निजमुखी लागला चाळा।
हरिस्मरणाचेनी बळे अंकित केले कळिकाळा। एका जनार्दनी अखंड सुख सोहळा॥६॥

(११३)

[७] मी वासुदेव नामे नित्य फोडितो टाहो। देखिले पाय आता मागतो दान द्या हो।
सावळे रूप माझ्या मानसी नित्य राहो। पावन संतवृंदे सादरे दृष्टी पहा हो॥१॥
राम कृष्ण वासुदेवा। हरि राम कृष्ण वासुदेवा॥धृ॥
सांडोनि सर्व चिंता संतपदी लक्ष लागो। मुक्त मी सर्वसंगी सर्वदा वृत्ती जागो।
भाविक प्रेमळांच्या संगती लागो॥३॥
अद्वैतेचि चालो अक्षयी भक्तीयोग। स्वप्नीही मानसाते नातळो द्वैतसंग।
अद्वैयानंदवेधे नावडो अन्यभोग। अक्रियत्वचि वाहो सत्क्रियारूप बोध॥३॥
पाहता विश्व माते निजरूप दाखवी। सत्कथा श्रवण कर्णी पियुष चाखवी।

रसने नाम मंत्र सर्वदा प्रेम देई। तोषला देवराणा म्हणे बा रे घेई॥४॥
हे दान पावले सद्गुरू शांतिलिंगा। हे दान पावले आत्मया पांडुरंगा।
हे दान पावले व्यापका अंतरंगा। हे दान पावले एका जनार्दनी दोष जाती भंगा॥५॥

(११४)

(८) कर जोडोनी विनवितो तुम्हा। नका करू संसार श्रमा।
नका गुंतू विषय कामा। तुम्ही आठवा मधुसुदना॥१॥
तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा॥धृ॥
नरदेह दुर्लभ जाणा। शत वर्षाची गणना।
त्यामध्ये दुःख यातना। तुम्ही आठवा मधुसूदना॥३॥
न लगे तीर्थाचे भ्रमण। न लगे दंडण मुंडन।
न लगे पंचाग्नी साधन। तुम्ही आठवा मधुसूदना॥४॥
हेचि माझी विनवणी। जोडितो कर दोन्ही।
शरण एका जनार्दनी तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी॥५॥

श्री नामदेवरायांचे वासुदेव

(११५)

[१] बाबा अहंकारनिशी घनदाट। गुरूवचनी फुटली पहाट।
माता भक्ति भेटली बरवंट। तिने मार्ग दाविला चोखट गा॥१॥
नरहरि रामा गोविंदा वासुदेवा॥धृ॥
एक बोल सुस्पष्ट बोलावा। वागे हरि हरि म्हणावा।
संत समागमु धरावा। तेणे ब्रह्मानंद होईल अवघा गा॥३॥
आला शीतळ शांतीचा वारा। तेणे सुख झाले या शरीरा।
फिटला पातकांचा थारा। कळीकाळासी धाक दरारा गा॥४॥
अनुहात वाजती टाळ। अनुक्षीर गीत रसाळ।
अनुभवे तन्मय सकळ। नामा म्हणे केशव कृपाळु गा॥५॥

श्री ज्ञानोबारायांचे वासुदेव

(११६)

[१] बाबा ममतानिशी अहंकार दाट। रामनामे वासुदेवी वाट।
गुरुकृपे वोळले वैंकुंठ। तेणे वासुदेव दिसे प्रगट गा॥१॥
वासुदेव हरि वासुदेव हरि। राम कृष्ण हरि वासुदेवा॥धृ॥
आला पुंडलिक भक्तराज। तेणे केशव ओळला सहज।
दिधला विठ्ठल मंत्र बीज। तेणे झाले सर्व काज गा॥३॥
राम कृष्ण वासुदेवे। वैष्णव गाताती आवघे।
दिंडी टाळ प्रेम भावे। वासुदेवी मन समावे गा॥४॥
शांती क्षमा दया पुरी। वासुदेवो घरोघरी।
आनंद ओसंडला अंबरी। प्रेमे डुले त्रिपुरारी गा॥५॥
वासुदेवी ज्ञेय ज्ञान। ध्यानी मनी नारायण।
वासुदेवो परिपुर्ण। कैसे क्षरलेसे चैतन्य गा॥६॥
वासुदेवी वाहुनी टाळी। पातके गेली अंतराळी।
वासुदेवो वनमाळी। कीर्तन करू ब्रह्ममेळी गा॥७॥
ज्ञानदेवा वासुदेवी। प्रीतीपान्हा उजळी दिवी।

टाळ चिपळी धरूनी जीवी। ध्यान मुद्रा महादेवी गा॥८॥

(११७)

[२] घुळघुळा वाजती टाळ। झणझणा नाद रसाळ।
उदो जाहाला पाहाली वेळ। उठा वाचे वदा गोपाळ॥१॥
कैसा वासुदेव बोलतो बोल। बाळापोटी माय रिघेल।
मेले माणुस जीत उठविल। वेळ काळाते ग्रासील गा॥धृ॥
आता ऐसेची अवघे जन। येते जाते तयापासुन।
जगी जग झाले जनार्दन। उदो प्रगटले बिंबले भान गा॥३॥
टाळा टाळी लोपला नाद। अंगोअंगी मुराला छंद।
भोग भोगिताचि आटला भेद। ज्ञान गिळोनी गावा गोविंद गा॥४॥
गावा आत बाहेर हिंडे आळी। देवदेवीची केली चिपळी।
चरण नसता वाजे धुमाळी। ज्ञानदेवाची कांती सावळी गा॥५॥

(११८)

[३] ॐ नमो भगवते वासुदेवाया। द्वादशाक्षरी मंत्र न जपसी काह्या॥धृ॥
वोडियाणा बंदु घालुनि देहुडा लागसील पावो। ओतप्रोत सांडुनी मना धरिसी अहंभावो।
ॐकार बिंदुचा तू न पवसी ठावो। वोळगे वोळगे कृष्ण द्वारावतीये रावो॥२॥
नागिणी उत्साहे नवहि द्वारे निरोधुन। नाडित्रयामाजी सुषुम्नासंचरण।
न साधे हा मार्ग ऐसे बोलती मुनिजन। नरहरि चिंतने अहर्नीशी मुक्तिस्थान॥३॥
मोडिसी करचरण तेणे पावसी अंत समो। मोहो तृष्णा न तुटे ब्रह्मविद्या केवी गमो।
मोठा हा अन्यायो जे हरिचरणी नाही नमो। मोक्षाची चाड तरी मुकुंदी मन रमो॥४॥
भांबावसी झणे हे शरीर कर्दळीस्तंभ। भस्म कृमी विष्ठा उभे आहे ते सुशोभ।
भाविता किटकी झाली भृंगी तिया कृमीले नभ। भावे भक्ती सुलभ वोळगा वोळगा पद्मनाभ॥५॥
गति मति इंद्रिये जव आहेती समयोग। गणिता आयुष्य न पुरे जव हे वचे भंग।
गमला हाचि योग जे अनुसरावा श्रीरंग। गरूडध्वजप्रसादे निस्तरिजे भवतरंग॥६॥
वनी सिंह वसता गजी मदु केवी धरावा। वन्हिदग्धबीज त्यासी अंकुर केवी फुटावा।
वज्रपाणी कोपलिया गिरी उदधी केवी लंघावा। वदनी हरि उच्चारी तेणे संसार केवी भुंजावा॥७॥
तेज नयनीचा भानु जेणे तेजे मीनले ते। त्याचे मानसीचा चंद्रमा तो सिंपीतो अमृते।
त्याचे नाभीकमळी ब्रह्मा तेणे सृजिली सकळही भूते। ते विराट स्वरूप ओळखावे विष्णुभक्ते॥८॥
वाताघाते फुटे गगनी मेघांचा मेळावा। वारिबिंदु पद्मीणीपत्री केवी ठेवावा।
वानराच्या हाती चिंतामणी केवी हो द्यावा। वासुदेव चिंतने तोची कल्मष उठावा॥९॥
सुक्ष्म स्थुळ भुते चाळीता हे परमहंसु। शुळपाणि देवोदेवी जयाचा रे अंशु।
शुभाशुभी कर्मी न करी नामाचा आळसु। सुखे निरंतरी ध्याई ध्याई ह्रषिकेशु॥१०॥
देव देऊनी उदार भक्ता देतो अमरपदे। देता न म्हणे सानाथोर वैरियासी तेचि दे।
देहे सार्थक अंती वासुदेव आद्य छंदे। देखा अजामेळ उद्धारला नामे येणे मुकुंदे॥११॥
वाडा सायासी मनुष्य जन्म पवावा। वियाला पुरूषार्थ तो का वाया दवडावा।
काया वाचा मने करूनी मुरारी वोळगावा। व्रते एकादशी करूनी परलोक ठाकावा॥१२॥
या धनाचा न धरी विश्वास जैसी तरूवर छाया। यातायाती न चुके तरी हे भोगिसील काह्या।
या हरिभजनेविण तुझा जन्म जातो वाया। यालागी वैकुंठनाथाच्या तु चिंती पा रे पाया॥१३॥
इहीच द्वादशाक्षरी ध्रुव अढळपद पावला। प्रह्लाद रक्षिला अग्नीशस्त्रापासुनि जळा।
बापरखुमादेवीवरू विठ्ठलु ध्यारे वेळोवेळा। तो कळिकाळापासूनी सोडवील अवलीळा॥१४॥

जोगी

(११९)

[१] जग जोगी जग जोगी। जाग जाग बोलती॥धृ॥
जागता जगदेव। राखा काही भाव॥२॥
अवघा क्षेत्रपाळ। पुजावा सकळ॥३॥
पुजापत्र काही। फळ पुष्प तोय ॥४॥
बहुता दिवसा फेरा। आला या नगरा॥५॥
नका घेउ भार। धर्म तोचि सार॥६॥
तुका मागे दान। द्यावे जी अनन्य॥७॥

॥भजन॥
॥ वासुदेव हरि जय जय पांडुरंग॥

आंधळे पांगुळ (१२०)

[१] आलासी कोठोनिया जासी कवणे रे ठाया। घरदार तुझे नाही अवघी लटकीच माया॥१॥
सावध होई बापा काळ लागला मापा। प्रपंची गुंतू नको पाहे बुडतसे पापा॥धृ॥
त्रिकुट कोसल्याने घर सायासे केले। दोन्ही द्वारे लिंपुनिया आत गुंतुगुंतु मेले॥३॥
मोठे मोठे साधुसंत तेणे सायास केले। प्रपंची असताना मन नाही गोविले॥४॥
वेदशास्त्रपुराणे हाक मारिती लोका। गाफिल निजताना काळ देईल धोका॥५॥
बोधला म्हणे तुम्ही हरि नाम जपा। लक्षचौऱ्यांशी चुकतील खेपा॥६॥

श्री तुकोबारायांचे आंधळे पांगुळ

(१२१)

[१] पांगुळ झालो देवा नाही हात ना पाय। बैसलो जयावरी सैराट ते जाय।
खेटिता कुंप काटी खुंट दरडी न पाहे। आधार नाही मज कोणी बाप ना माय॥१॥
दाते हो दान करा जाते पंढरपुरा। न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा॥धृ॥
हिंडता गव्हाणे गा शिणलो येरझारी। न मिळेची द्ता कोणी जन्मदुःक निवारी।
किर्ती हे संतामुखी तोचि दाखवा हरि। पांगुळा पाय देतो नांदे पंढरपुरी॥३॥
या पोटाकारणे गा झालो पांगिला जना। न सरेची मायबाप भीक नाही पोटी खंडणा।
पुढारा म्हणती एक तया नाही करूणा। श्वान हे लागे पाठी आशा बहु दारूणा॥४॥
काय मी चुकलो गा मागे नेणवेचि काही। न कळेचि पापपुण्य येथे आठव नाही।
मी माजी भुललो गा दीप पतंग सोयी। द्या मज जीवदान संत महानुभाव काही॥५॥
दुरोनी आला मी गा दुःख झाले दारूण। यावया येथवरी होते हेचि कारण।
दुर्लभ भेटी तुम्हा पायी झाले दरूषण। विनवितो तुका संता दोन्ही कर जोडुन॥६॥

(१२२)

[२] देखत होतो आधी मागे पुढे सकळ। मग हे दृष्टी गेली वरी आले पडळ।
तिमिर कोंदलेसे वाढे वाढता प्रबळ। भीत मी झालो देवा काय ज्याल्याचे॥१॥
आता मज दृष्टी देई पांडुरंगा मायबापा। शरण मी आलो तुज निवारूनिया पापा।
अंजन लेववूनि करी मारग सोपा। जाईन सिद्धपंथे अवघ्या चुकतील खेपा॥धृ॥
होतसे खेद चित्ता कांही नाठवे विचार। जात होतो जनामागे तो हि सांडिला आधार।
हा ना तो ठाव झाला अवघा पडिला अंधार। फिरली माझी मज कोणी न देती आधार॥३॥
जोवरी चळण गा तोवरी म्हणती माझा। मानिती लहान थोर देहसुखाचिया काजा।

इंद्रिये मावळली आला बागुल आजा। कैसा विपरीत झाला तोचि देह नव्हे दुजा॥४॥
गुंतलो या संवसारे कैसे झालोसे अंध। मी माझे वाढवूनि मायातृष्णेचा बाध।
स्वहित न दिसेचि केला आपला वध। लागले काळ पाठी सवे काम हे क्रोध॥५॥
लागती चालता गा गुणदोषाच्या ठेंसा। सांडिली वाट मार्ग झालो निराळा कैसा।
पाहातो वास तुझी थोर करूनि आशा। तुका म्हणे वैद्यराजा पंढरीच्या निवासा॥६॥

(१२३)

[३] आंधळ्या पांगळ्याचा एक विठोबा दाता। प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता।
घडी मोडी हेळामात्रे पापपुण्य संचिता। भवदुख कोण वारी तुजवुनी चिंता॥१॥
धर्म गा जागो तुझा तुचि कृपाळु राजा। जाणसी जीवीचे गा न सांगता सहजा॥धृ॥
घातली लोळणी गा पुंडलीके वाळवंटी। पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटी।
न देखे दुसरे गा झाली अदृश्य दृष्टी। वोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी॥३॥
आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटे। न देखे न चलवे जना चालते वाटे।
घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे। पावला त्या कारणे धाव घातली नेटे॥४॥
बैसोनि खोळी शुक राहे गर्भी आंधळा। शीणला येरझारी दुःख आठवी वेळा।
मागील सोसिले ते ना भी म्हणे गोपाळा। पावला त्याकारणे लाज राखिली कळा॥५॥
न देखे जो या जना तया दावी आपणा। वेगळा सुखदुःखा मोहो नाठवी धना।
आपपर तेही नाही बंधुवर्ग सज्जना। तुकया तेचि परी झाली पावे नारायणा॥६॥

(१२४)

[४] सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथे। वृत्ति हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथे।
मी माझे हारपले ठायी जेथीच्या तेथे। अदृश्य तेचि झाले काही दृश्य जे होते॥१॥
सुखे मी निजलो गा शुन्य सारूनि तेथे। त्रिकुटशिखरी गा दान मिळे आईते॥धृ॥
टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा। कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा वोळसा।
न मागे भीक आता हाचि झाला भरवसा। वोळली सत्रावी गा तिणे पुरविली इच्छा॥३॥
उर्ध्वमुखे आळविला सोहं शब्दाचा नाद। अरूप जागविला दाता घेऊनि छंद।
घेऊनि आला दान निजतत्व निजबोध। स्वरूपी मेळविले नाव ठेवियला भेद॥४॥
शब्द हा बहुसार उपकाराची राशी। म्हणोनि चालविला मागे येतील त्यासी।
मागोनी आली वाट सिद्ध ओळीची तैसी। तरले तरती गा आणिकही विश्वासी॥५॥
वर्म ते एक आहे दृढ धरावा भाव। जाणीव नागवण नेदी लागो ते ठाव।
म्हणोनि संग टाकी सेवी अद्वैत भाव। तुका म्हणे हाचि संती मागे केला उपाव॥६॥

(१२५)

[५] भगवंता तुजकारणे मेलो जीताचि कैसी। निष्काम बुद्धि ठेली चळन नाही तयेसी।
न चलती हात पाय दृष्टी फिरली कैसी। जाणता न देखो गा क्षर आणि अक्षरासी॥१॥
विठोबा दान दे गा तुझ्या सारिखे नामा। किर्ती हे वाखाणिली थोर वाढली सीमा॥धृ॥
भुक्ति मुक्ति तुचि एक होसी सिद्धीचा दाता। म्हणोनी सांडवली शोक भय लज्जा चिंता।
सर्वस्वे त्याग केला धाव घातली आता। कृपादान देई देवा येऊनि सामोरा आता॥३॥
संसारसागरू गा भवदुःखाचे मुळ। जनवाद अंथरूण माजी केले इंगळ।
इंद्रिये वज्रघाते तपे उष्ण वरी ज्वाळ। सोसिले काय करू दुर्भळ हे चांडाळ॥४॥
तिही लोकी तुझे नाम वृक्ष पल्लव शाखा। वेंघलो वरि खोडा भाव धरूनी टेका।
जाणवी नरनारी जागो धर्म लोका। पावती पुण्यवंत सोई आमुचिये हाका॥५॥
नाठवे आपपर आता काय बा करू। सारिखा दोहीसवा हारपला विचारू।
घातला योगक्षेम तुज आपुला भारू। तुकया शरणागता देई अभयकरू॥६॥

(१२६)

[६] देश वेष नव्हे माझा सहज फिरत आलो। करू सत्ता कवणावरी कोठे स्थिर राहिलो।

पाय डोळे म्हणता माझे तिही कैसा मोकलिलो। परदेशी नाही कोणी अंध पांगुळ झालो॥१॥
आता माझी करी चिंता दान देई भगवंता। पाठी पोटी नाही कोणी निरवी सज्जन संता॥धृ॥
चालता वाट पुढे भय वाटते चित्ती। बहुत जन गेले नाही आले मागुती।
न देखो काय झाले कान तरी ऐकती। बैसलो संधिभागी तुज धरूनी चित्ती॥३॥
भाकितो करूणा गा जैसा सांडिला ठाव। न भरेचि पोट कधी नाही निश्चळ पाव।
हिंडता भागलो गा लक्ष चौऱ्यांशी गाव। धरूनि राहिलो गा हाचि वसता ठाव॥४॥
भरवसा काय आता कोण आणी अवचिता। तैसीच झाली किर्ती तया मज बहुता।
म्हणूनि मारी हाका सोयी पावे पुण्यवंता। लागली भुक थोरी तुचि कृपाळु दाता॥५॥
संचित सांडवले काही होते ते जवळी। वित्त गोत पुत माया तुटली हे लागावळी।
निष्काम झालो देवा होते माझे कपाळी। तुका म्हणे तुचि आता माझा सर्वस्वे बळी॥६॥

श्री एकनाथ महाराजांचे आंधळे पांगुळ

(१२७)

[१] मार्ग बहुत असती परि तयांची न कळे गती। म्हणोनि पडियलो माया मोहभ्रांती।
तेणे मी जाहालो अंध कोण धरील चित्ती। मारितो हाका मोठ्याने अहो उदारा श्रीगुरूमुर्ती॥१॥
धाव धाव श्रीगुरूराया काढी देऊनि हात। बुडतसे भवनदीमाजी न कळे अंत।
शिण बहु मज जाहला श्रमलो पाहत पाहत। यांतुनी सोडी वेगी तुम्हा श्रीगुरूसमर्थ॥धृ॥
वाटे आडवाट दरी दरकुटे यामाजी गुंतले। कन्या पुत्र स्त्रीधन हे वर पडिले जाळे।
कवण उगवील कवणा शरणा जाऊ ते न कळे। करितो चिंता ह्रदयी तव श्रीगुरू भेटले॥३॥
मार्ग हा दाविला जेथे नाही गोवागुंती। श्रीगुरू प्रसन्न जाहले निवारली अवघी भ्रांती।
एका शरण जनार्दनी जाहली संतोषवृत्ती। अंधपण फिटले निवारली पुनरावृत्ती॥४॥

(१२८)

[२] आधी देखत होतो सकळ। मग हि दृष्टी गेली आले पडळ।
चालता मार्ग न दिसे केवळ। आता मज करा कृपा मी दीन तुम्ही दयाळ॥१॥
दाते हो दान करा तुम्ही संत उदार। चालता मार्ग दाखवा मज निर्धार।
गुंतलो लोभ आशा न कळे विचार। दृष्टी ते फिरवूनि द्या मुखी नामाचा उच्चार॥धृ॥
त्रैलोक्यात तुमची थोरी पुराणे वर्णिती साचार। वेदही तुम्हा गाती तया न कळे निर्धार।
किर्ती गाती सनकादिक तो दाखवा श्रीधर। म्हणोनि धरिला मार्ग नका अव्हेर॥३॥
अंधपण सर्व गेले श्रीगुरूचा आधार। तेणे पंथे चालताना फिटला मायामोह अंधार।
एका जनार्दनी देखिला परेपरता पर। श्रीगुरुजनार्दन कृपेने दाविले निजघर॥४॥

(१२९)

[३] पंढरपुर पाटणी गा महाराज सार्वभौम। पांडुरंग दिनबंधु जयाचे ते नाम॥१॥
आंधळ्या जीवीचे तो जाणतो धर्म। म्हणोनि आलो गा देई माझे मज वर्म॥धृ॥
असोनि हात पाय डोळे जाहालो मी आंधळा। मुखी नाम तुझे लागला वाचेसी चाळा॥३॥
देऊनि दान माते नाम सांगे ये काळी। विठोबाचे दान आले ऐसी देईन आरोळी॥४॥
दान पावले संतसंगे भक्तीचे। एका जनार्दनी अखंड नाम वाचे॥५॥

(१३०)

[४] मी माझे कल्पनेने झालोसे पांगुळ। चालता न चलवेचि कोठे न मिळे स्थळ।
हिंडलो दिशा दाही श्रम जाहला केवळ। कवण हि भ्रांती वारी कैं भेटेल गुरूदयाळ॥१॥
धर्म जागो गुरूमहिमा देही दाविला देव। निवारूनी भवर जाळे अवघा निरसला भेव॥धृ॥
कर्म त्या अकर्माच्या लागती वाटे ठेसा। संपत्ती विपत्तीचा मानिला भरवसा।

कन्या पुत्र आप्त जन हा तो सहज वोळसा। या भ्रमडोही बुडालो धावे गुरूराया सर्वेशा॥३॥
येऊनि गुरूनाथे माथा ठेविला करू। अज्ञान तिमिर गेले शुद्ध मार्ग साचारू।
गर्जत चालियेलो फिटला अज्ञान अंधारू। एका जनार्दनी माझा श्रीगुरू उदारू॥४॥

(१३१)

[५] मृत्युलोकी एक नगर त्याचे नाव पंढरपुर। तेथील मोकाशी उभा असे विटेवर।
पुंडलिक भक्तराज शोभे चंद्रभागातीर। बोलती साधुसंत जीवा वाटे हुरहुर॥१॥
तुम्ही संत मायबाप येवढा उपकार करा। न्या मज तेथवरी दाखवा दीनांचा सोयरा॥धृ॥
मज नाही हातपाय डोळा पडली झापड। कर्ण हे बधिर झाले वाचा बोले बोबड।
नाक मुख गळू लागले लाळ आणि शेंबुड। श्वानापरी गती झाली अवघे करिती हाड हाड॥३॥
साधुसंत मायबाप जे का दयेचे सागर। भावाचे मुख्य स्थान भक्तीचे ते माहेर ।
तिही केले कृपादान मस्तकी ठेविला कर। माया मोह निरसली शुद्ध झाले कलेवर॥४॥
भाव दिला मज सांगाते मार्ग दाविला नीट। भ्रांति हे समुळ गेली दिसू लागली वाट।
नाचत प्रेमछंदे चालु लागलो सपाट। एका जनार्दनी पावलो पंढरी पेठ॥५॥

(१३२)

[६] सहजपुर पाटणी गा एक जनार्दन दाता। पांगुळा पाय देतो विश्रांती समस्ता॥१॥
यालागी नाम त्याचे दुःख निरसी मनाचे। पांगुळा जीवीचे तोचि चालवी साचे॥धृ॥
जीवे जिता मी पांगुळ दिधला निजबोध ढवळा। त्यावरी बैसोनि क्रीडे सर्वत्र स्वलीला॥३॥
एकाएकु परम दीन अंध पंगु अज्ञान। जनार्दने कृपा करून करवी निजसत्ता चलन॥४॥

(१३३)

[७] अंध पंगु दृढ जाहलो बांधलो संसारी। मायामोह भरली नदीमाजी दुस्तर मगरी।
यातुन कोण सोडवील नाना परीचे दुःख भारी। देवयोगे भेटला तो जनार्दन गुरू सत्वरी॥१॥
धर्म जागो जनार्दनाचा तेणे निवारिला फेरा। चुकविल्या चौऱ्यांशीच्या तयाने येरझारा।
मोक्षप्राप्ती वाट जाहली दाविला सोयरा। जन्म मरण दुःख गेले जाहालो सैराट मोकळा॥धृ॥
घातिले अजन डोळा दिसो लागली वाट। मोकळा मार्ग जाहला चालिलो सैराट।
श्रीगुरूजनार्दन मुखी नामाचा बोभाट। एका जनार्दनी पावलो मुळची पेठ॥३॥

(१३४)

[८] असोनिया दृष्टी जाहलो मी आंधळा। आपंगिले जिही जाहलो त्या वेगळा।
मायबाप माझे म्हणती मज माझ्या बाळा। शेवटी मोकलिती देती हाता काळा॥१॥
संत तुम्ही मायबाप माझी राखा काही दया। लागतो मी वारंवार तुमच्या पाया॥धृ॥
इंद्रिये माझी न चलती क्षणभरी। गुंतलो मायामोहे या संसाराचे फेरी।
अंथरूण गातले इंगळाचे शेजेवरी। कैसी येईल निद्रा कोण सोडवील निर्धारी॥३॥
मायबाप तुम्ही संत तुम्ही उपकार करा। जगी नांदतो जनी एवढा जनार्दन खरा।
तयाचिया चरणावरी मस्तक निर्धारा। एका जनार्दनी करी विनंती अवधारा॥४॥

(१३५)

[९] ॐकार निज वृक्ष त्यावरी वेधलो प्रत्यक्ष। दान मागी रामकृष्ण जनार्दना प्रत्यक्ष॥१॥
झालो मी अंध पंगु। माजा कोणी न धरती संगु॥धृ॥
चालता वाट मार्गी मज काही दिसेना। उच्चारिती नाम संतमार्गे चालिलो जाणा॥३॥
पाहुनी पंढरी पेठ अंधपणा फिटलो। एका जनार्दनी संतपायी लीन झालो॥४॥

(१३६)

[१०] दाते बहुत असती परि न देती साचार। मागत्याची आशा बहु तेणे न घडे विचार।
सम देणे सम घेणे या नाही प्रकार। लाजिरवाणे जिणे दोघांचे धर्म अवघा असार॥१॥
तैसा नोहे दाता माझा जनार्दन उदार। तुष्टला माझ्या देही दिधले अक्षय अपार।
न सरेचि कल्पांती माप लागले निर्धार। मागतेपण हारपले दैन्य गेले साचार॥धृ॥

देऊनी अक्षय दान पदा बैसविला अढळ। मायामोह तृष्णा हाचि चुकविला कोल्हाळ।
एका जनार्दनी एकपणे निर्मळ। शरण एका जनार्दनी कायावाचा अढळ॥३॥

श्री नामदेवरायांचा आंधळा पांगुळ

(१३७)

[१] जंबु या द्वीपामाजी एक पंढरपुर गाव। धर्माचे नगर देखा विठो पाटील त्याचे नाव।
चला जाऊ तया ठाया काही भोजन मागाया॥१॥
विठोबाचा धर्म जागो। त्याचे चरणी लक्ष लागो॥धृ॥
ज्यासी नाही पंख पाय तेणे करावे ते काय। शुद्ध भाव धरोनिया पंढरपुरासी जावे।
इच्छिले फळ देतो यासी नवलाव ते काय॥३॥
भक्ति आणि भावार्थाचा जेणे गुंफियेला शेला। विठोबा दाताराच्या घरा उचित नेला।
उशिर ना लागता जन्मा वेगळा॥४॥
सुदामा ब्राह्मण दुःखे दरिद्रे पिडीला। मुष्टी पोहे घेऊनि त्याचे भेटिलागी गेला।
शुद्ध भाव देखोनिया गाव सोनियाचा दिला॥५॥
गण आणि गोत्रज सर्व हासताती मज। गेले याचे मनुष्यपण येणे सांडियेली लाज।
विनवितो शिंपी नामा संतचरणीचा रज॥६॥

श्री ज्ञानोबारायांचे आंधळे पांगुळ

(१३८)

[१] पुर्वजन्मी पाप केले ते बहु विस्तारिले। विषयसुख नाशिवंत सेविता तिमिर कोंदले।
चौऱ्यांशी लक्ष योनी फिरता दुःख भोगिले। ज्ञानदृष्टि हारपली दोन्ही नेत्र आंधळे॥१॥
धर्म जागो सदैवांचा जे बा परउपकारी। आंधळ्या दृष्टि देतो त्यांचे नाम मी उच्चारी॥धृ॥
संसार दुःखमुळ चहुकडे इंगळ। विश्रांती नाही कोठे रात्रंदिवस तळमळ।
कामक्रोध लोभ शुनी पाठी लागली ओढाळ। कवणा मी शरण जाऊ आता दृष्टि देईल निर्मळ॥३॥
मातापिता बंधु बहिणी कोणी न पवती निर्वाणी। इष्टमित्रस्वजनसखे हे तो सुखाची मांडणी।
एकला मी दुःख भोगी कुंभपाक जाचणी। तेथे कोणी सोडविना एका सद्गुरूवांचुनि॥४॥
साधुसंत मायबाप तिही केले कृपादान। पंढरिये यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान।
पुंडलिक वैद्यराजे पुर्वी साधिले साधन। वैकुंठीचे मुळपीठ डोळा घातले ते अंजन॥५॥
कृष्णांजन एकवेळा डोळा घालिता अढळ। तिमिर दुःख गेले फिटले भ्रांतीपडळ।
श्रीगुरू निवृत्तीराये मार्ग दाविला सोज्वळ। बापरखुमादेवीवरू विठ्ठल दीनाचा दयाळ॥६॥

(१३९)

[२] देवा तुज चुकलो गा तेणे दृष्टी आले पडळ। विषयग्रंथी गुंतलोसे तेणे होतसे विव्हळ।
अंध मंद दृष्टी झाली गिळु पाहे हा काळ। अवचित दैवयोगे निवृत्ती भेटला कृपाळ॥१॥
धर्म जागो निवृत्तीचा तेणे फेडिले पडळ। ज्ञानाचा निजबोधु विज्ञानरूप सकळ॥धृ॥
तिही लोकी विश्वरूप दिव्य दृष्टी दिधली। द्वैत हे हरपले अद्वैतपणे माऊली।
उपदेश निजब्रह्म ज्ञानांजन साउली। चिद्रूप दीप पाहे तेथे तनुमनु निवाली॥३॥
दान हेचि आम्हा गोड देही दृष्टि मुराली। देह हे हरपले विदेहवृत्ति स्फुरली।
विज्ञान हे प्रगटले ज्ञेय ज्ञाता निमाली। दृश्य ते तदाकार ममता तेथे बुडाली॥४॥
प्रपंचु हा नाही जाणा एकाकार वृत्ति झाली। मी माझे हरपले विषयांध या बोली।
उपरती सद्गुरू बोधु तेथे प्रकृति संचली। धर्ममार्गे शुद्ध पंथ हाती काठी दिधली॥५॥
वेदमार्गे मुनी गेले त्याचि मार्गे चालिलो। न कळेचि विषयांधा म्हणोनी उघड बोलिलो।
चालता धनुर्धरा तरंगाकारी हरपलो। ज्ञानदेव निवृत्तीचा द्वैत सर्व निरसलो॥६॥

(१४०)

[३] मृत्युलोका माझारी गा एक सद्गुरू साचारू। त्याचेनि गा दर्शने तुटला हा संसारू।
पांगुळा हस्तपाद देतो कृपाळु उदारू। यालागी नाव त्याचे वेदा न कळे पारू॥१॥
धर्माचे वस्तिघर ठाकियले बा आम्ही । दान मागो ब्रह्म साचे नेघो द्वैत या उर्मी॥धृ॥
विश्रांती विजन आम्हा एक सद्गुरू दाता। सेविता चरण त्याचे फिटली इंद्रियांची व्यथा।
निमाली कल्पना आशा इळा परिसी झगटता। कैवल्य देह झाले उपरती देह अवस्था॥३॥
मन हे निमग्न झाले चरणस्पर्शे तत्त्वता। ब्रह्माहंस्फुर्ति आधी भावो उमटला उलथा।
पांगुळले गुह्य ज्ञान ब्रह्मरूपे तेथे कथा। अंध मग दृढ झालो निमाल्या विषयाच्या वार्ता॥४॥
ऋद्धिसिद्धि दास्य सख्य आपेआप वोळली। दान मान मंद बुद्धि ब्रह्मरूपे लीन झाली।
वोळली कामधेनु पंगु तनु वाळली। पांगुळा जीवनमार्गु सतरावी हे वोळली॥५॥
पांगुळ मी कल्पनेचा पंगु झालो पै मने। वृत्ति हे हरपली एका सद्गुरूरूप ध्याने।
निवृत्तीसी कृपा आली शरण गेलो ध्येयध्याने॥६॥

(१४१)

[४] धर्म अर्थ काम मोक्ष दान मागे श्रीगुरू। हस्त पाद शरीर व्यथा पंगु झालो मी पुढारू।
तिमिर आले पुढे मायामोहो उदारु। तेणे मी जात होतो मग सहज भेटला सद्गुरू॥१॥
धर्म जागो सद्गुरू महिमा जेणे तुटे भवव्यथा। हाचि धर्म अर्थ काम येर ते मी नेघे वृथा॥धृ॥
एक नाम राम कृष्ण याचे दान देई सद्गुरु। वेदशास्त्र मथन केले परि नव्हेचि पुढारू।
शरण आलो निवृत्तीराया तोडी माया संसारू। पाहाता इये भुवनी तुजविण नाही उदारू ॥३॥
ज्ञानेसहित विज्ञान गिळी मी माझे पांगुळ। वृत्ति हे माझे ठायी ह्दयी बुझे गोपाळ।
शंख चक्र पद्म गदा तुष्टे ऐसा तु दयाळ। बापरखुमादेवीवरे दान देऊनि केले अढळ॥४॥

(१४२)

[५] पुर्वप्राप्ती दैवयोगे पंगु झालो मी अज्ञान। विषय बुंथी घेउनिया त्याचे केले पोषण।
चालता धर्म बापा विसरलो गुह्य ज्ञान। अवचटे गुरूमार्गे प्रगट ब्रह्मज्ञान॥१॥
दाते हो वेग करा कृपाळु बा श्रीहरि। समता सर्व भावी शांती क्षम् निर्धारी।
सुटेल विषयग्रंथी विहंगम आचारी॥धृ॥
शरण रिघे सद्गुरू पाया पांग फिटेल पांचाचा। पांगुळले आपोआप हा निर्धारु पै साचा।
मनामाजी रूप घाली मी माजी तेथे कैचा। हरपली देहबुद्धि एकाकार शिवाचा॥३॥
निजबोधे धवळा शुद्ध यावरी आरूढ पै गा। क्षीराब्धी वोघ वाहे तेथे जाय पां वेगा।
वासना माझी ऐसी करी परिपुर्ण गंगा। नित्य हे ज्ञान घेई अद्वैत रुपलिंगा॥४॥
पावन होशी आधी पांग फिटेल जन्माचा। अंधपंग विषयग्रंथी पावन होशील साचा।
पांडुरंगे होसी आधी फळ पीक जन्माचा। दृष्ट बुद्धी टाकी वेगी टाहो करी नामाचा॥५॥
ज्ञानदेव पंगुपणे पांगुळली वासना। मुराले ब्रह्मी मन ज्ञेय ज्ञाता पुरातना।
दृश्य हे लोपले बापा परती नारायणा। निवृत्ति गुरु माझा लागो त्याच्या चरणा॥६॥

(१४३)

[६] अंध पंगु दृढ झालो माया पडळ भ्रांती। कर चरण विव्हळ गेले तव भेटले निवृत्ती।
ज्ञान मज उदेशिले नेले अज्ञान क्षिती। वृक्ष एक तेथे होता त्या तळी बैसविले रिती॥१॥
धर्म जागो निवृत्तीचा हरिनामे उत्सावो। कर्म धर्म लोपले माझे माझा फिटला संदेहो।
धर्म अर्थ काम पुर्ण दान मान संमोहो। नेघे मी इंद्रियवृत्ति रामकृष्णनामी टाहो॥धृ॥
कल्पना मावळली कल्पवृक्षाचे तळवटी। चिंता हे हरपली माझी नित्य अमृताची वाटी।
मन हे निमग्न झाले नित्य वसे वैकुंठी। तापत्रये ताप गेले नाना दोषांचे थाटी॥३॥
अनंत हे मायामय लोपले जिवाचियासाठी। हरपल्या योनीमाळा चिंतामणी कसवटी।
सिद्धि बुद्धि समरसल्या जिवशिव एकदाटी। आत्माराम मन झाले एकतत्व शेवटी॥४॥
आत्माराम निर्गमले वेदशास्त्र गुह्यज्ञाने। वासनेचि मोहजाळी ते विराली नाना स्थाने।

फुटले नाना घट तुटली नाना बंधने। सुटल्या जिवग्रंथी ऐसे केले त्या दाने॥५॥
मोक्ष हे ठेले मागे मुक्तिमार्ग निमाला। वृत्ति हे बुडाली माझी निवृत्ति गळाळा पाजीला।
सत्रावी वोळली बाळा आत्माराम दाता झाला॥६॥
बुद्धि बोध संवगडे साजीव करचरण। नयनी नयन झाले चक्षु मी समाधान।
दिव्य देह अमृत कळा दशदिशा परिधान। सर्व हे ब्रह्म झाले फळद फळले विज्ञान॥७॥
निवृत्ती गुरू माझा अंधपण फेडिलो। सर्वत्र दृष्टि झाली एकतत्वी राहिलो।
निरसली माया मोहो श्रीराम अंजन लेईलो। ज्ञानदेव ज्ञानगंगे निवृत्तीने बुडविलो॥८॥

बहिरा

(१४४)

[१] बहिरा झालो या जगी॥धृ॥
नाही ऐकले हरिकीर्तन। नाही केले पुराण श्रवण।
नाही वेदशास्त्र पठन। गर्भी बहिरा झालो त्या गुणे॥२॥
नाही संतकिर्ती श्रवणा आली। नाही साधुसेवा घडियेली।
पितृवचनासी पाठ दिधली। तीर्थव्रते असोनि त्यागिली॥३॥
माता माऊली पाचारिता। शब्द नाही दिला मागुता।
बहिरा झालो नरदेही येता। एका जनार्दनी स्मरेण आता॥४॥

मुका

(१४५)

[१] मुका झालो वाचा गेली॥धृ॥
होतो पंडित महाज्ञानी। दशग्रंथ षड्शास्त्र पुराणी।
चारी वेद मुखोद्गत वाणी। गर्वामध्ये झाली सर्व हानी॥२॥
जिव्हा लांचावली भोजना। दुग्ध घृत शर्करा पक्वान्ना।
निंदिले उपान्ना। तेणे पावलो मुखबंधना॥३॥
साधुसंताची निंदा केली। हरिभक्तांची स्तुती नाही केली।
तेणे वाचा पंगु झाली। एका जनार्दनी कृपा लाधली॥४॥

॥ भजन ॥
॥ जय जय विठोबा रखुमाई ॥

श्री तुकोबारायांच्या गवळणी

(१४६)

[१] स्वये सुखाचे झाले अनुभव। एक एकीपाशी सांगतील भाव।
अवघ्या अवघा हा कैसा नवलाव। सर्वसाक्षी तेथेचि त्याचा जीव वो॥१॥
आपआपणाशी करिती नवल। परि वादावाद न सांडिती न बोल।
एका मेघश्यामे जळधर वोल। रसी उतावीळ ह्रदय सखोल वो॥धृ॥
एक विषय तो सकळांचा हरि। त्याच्या आवडीने आवडी इतरी।
अंध बहिर हे प्रेत लोकाचारी। त्यांची किर्ती गाईली पुराणांतरी वो॥३॥
स्तुति पराविया मुखे रूचिकर। प्रीतिपात्राचा गौरवी आदर।
परस्परा हे सादरासादर। योग सज्जनाच्या सुखा नाही पार वो॥४॥

भक्तिवालभ न तुटे चराचरी। आप्त अनाप्त हे ऐशी नाही उरी।
दुरी जवळी संचिताऐसे धरी। रंगा रंगा ऐसे होणे लागे हरि वो॥५॥
तुका लाधला हे उच्छिष्ट भोजन। आला बाहेरी प्रेम वोसंडून।
कानी पडिले त्या जीवाचे जतन। धरी एका भावे ह्रदयी चरण वो॥६॥

(१४७)

[२] भरिला उलंडुनि रिता करी घट। मीस पाणियाचे गोविंदाची चट।
चाले झडझडा उसंतूनि वाट। पाहे पाळतूनि उभा तोचि नीट वो॥१॥
चाळा लावियेला गोपगोपीनाथे। जाणे आवडीचे रूप जेथे तेथे।
दावी बहुतांच्या बहुवेषपंथे। गुणातीते खेळ मांडियेला येथे वो॥धृ॥
मनी आवडे ते करावे उत्तर। काही निमित्ताचा पाहोनि आधार।
उगा राहे का मारिसी कंकर। मात वाढविसी उत्तरा उत्तर वो॥३॥
धरिली खोडी दे टाकोनिया मागे। न ये विनोद हा कामा मशी संगे।
मिठी घालीन या जीवाचिया त्यागे। नाही ठाऊकी पडिली तुझी सोंगे वो॥४॥
सुख अंतरीचे बाह्य ठसठसी। म्हणे विनोद हा काय सोंगे यासी।
तुज मज काय सोयरीक ऐसी। नंदनंदन या थोरपणे जासी रे॥५॥
करी कारण ते कळो नेदी कोणा। सुख अंतरीचे बाह्य रंग जना।
मन मिनले रे तुका म्हणे मना। भोग अंतरीचा पावे नारायणा वो॥६॥

(१४८)

[३] मैं भुली घरजानी बाट। गोरस बेचन आये हाट॥१॥
कान्हा रे मनमोहन लाल। सबही बिसरु देखे गोपाल॥धृ॥
काहा पग डारू देखे आनेरा। देखे तो सब वोहिने घेरा॥३॥
हूँ तो थकित भई रे तुका। भागा रे सब मनका धोका॥४॥

(१४९)

[४] आत हरि बाहेर हरि। हरिने घरी कोंडिले॥१॥
हरिने कामा घातला चिरा। वित्तवरा मुकविले॥धृ॥
हरिने जीवे केली साटी। पाडिली तुटी सकळांसी॥३॥
तुका म्हणे वेगळा नव्हे। हरि हा भोवे भोवताला॥४॥

(१५०)

[५] हरिने माझे हरिले चित्त। भार वित्त विसरले॥१॥
आता कैसी जाऊ घरा। नव्हे बरा लौकिक॥धृ॥
हरिने जीवे केली साटी। पाडिली तुटी सकळांसी॥३॥
तुका म्हणे वेगळा नव्हे। हरि हा भोवे भोवताला॥४॥

(१५१)

[६] गाई गोपाळ यमुनेचे तटी। येती पाणिया मिळोनि जगजेठी।
चेंडू चौगुणा खेळती वाळवंटी। चला चला म्हणवती पाहूं दृष्टी वो॥१॥
ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी। चित्त विव्हळते देखावया हरी।
मिस पाणियाचे करितील घरी। बारा सोळा मिळोनि परस्परी वो॥धृ॥
चिरे चोळिया त्या धुता विसरती। ऊर्ध्व लक्ष लागले कृष्णमूर्ती।
कोणा नाठवे हा कोण कुळ याती। झाल्या तटस्थ सकळा नेत्रापाती वो॥३॥
दंतधावनाचा मुखामाजी हात। वाद्ये वाजती नाईके जनमात।
करी श्रवण श्रीकृष्णवेणुगीत। स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो॥४॥

(१५२)
[७] गोड लागे परि सांगताचि नये। बैसे मिठी सये आवडीची॥१॥
वेधले वो येणे श्रीरंगरंगे। मी हे माझी अंगे हारपली॥धृ॥
परतेचि ना दृष्टि बैसली ते ठायी। विसावोनि पायी ठेले मन॥३॥
तुकयाच्या स्वामीसवे झाली भेटी। तेव्हा झाली तुटी मागिलाची॥४॥
(१५३)
[८] पाहावया माजी नभा। दिसे शोभा चांगली॥१॥
बैसला तो माझे मनी। नका कोणी लाजवू॥धृ॥
जीवी आवडे जीवाहूनि। नव्हे क्षण वेगळा॥३॥
झाले विश्वंभरा ऐसी। तुकया दासी स्वामीची॥४॥
(१५४)
[९] कोणी एकी भुलली नारी। विकिता गोरस घ्या म्हणे हरि॥१॥
देखिला डोळा बैसला मनी। तोचि वदनी उच्चारी॥धृ॥
आपुलियाचा विसर भोळा। गोविंद कळा कौतुके॥३॥
तुका म्हणे हासे जन। नाही कान ते ठायी॥४॥
(१५५)
[१०] हरिरता चपळा नारी। लागवरी न रिघती॥१॥
अवघ्या अंगे सर्वोत्तम। भोगी काम भोगता॥ध॥
वाचा वाच्यत्वासी न ये। कोठे काय करावे॥३॥
तुका म्हणे देवा ऐशा। देवपिशा उदारा॥४॥

श्री एकनाथ महाराजांच्या गवळणी

(१५६)
[१] नानापरी समजाविते परि न राहे श्रीहरि। दहीभात कालवोनि दिला वेगी झडकरी।
कडेवरी घेऊनिया फिरले मी द्वारोद्वारी॥१॥
राधे राधे राधे राधे घेई श्यामसुंदरा। नेई आता झडकरी आपुलिया मंदिरा॥धृ॥
क्षणभरी घरी असता करी खोडी शारंगपाणि। खेळावया बाहेर जाता आळ घेती गवळणी।
थापोटोनि निजविता पळोनि जातो राजद्वारा॥३॥
राधा घेऊनि हरीला त्वरे जात मंदिरी। ह्रदयमंचकी पहुडविला श्रीहरी।
एका जनार्दनी हरीला भोगी राधा सुंदरा॥३॥
(१५७)
[२] माझा कृष्ण देखिला काय। कोणी तरी सांगा गे॥धृ॥
हाती घेऊनिया फुल। अंगणी रांगत आले मुल।
होते सारवित मी चुल। कैसी भुल पडियेली॥२॥
माथा शोभे पिंपळपान। मेघवर्ण ऐसा जाण।
त्याला म्हणती श्रीभगवान। योगी ध्यान विश्रांती॥३॥
संगे घेऊनि गोपाळ। बाळ खेळे अळुमाळ।
पायी पोल्हारे झळाळ। गळा माळ वैजयंती॥४॥
एका जनार्दनी माय। घरौघराप्रती जाय।
कृष्णा जाणावे ते काय। कोणी तरी सांगा गे॥५॥

(१५८)

[३] कृष्णमुर्ती होय गे कळो आली सोय गे। प्राणाचाही प्राण पाहता सुख सांगु काय गे॥१॥
तुळसी माळ गळा गे कस्तुरीचा टिळा गे। अर्धांगी रूक्मीणी विझणे वारित गोपी बाळा गे॥धृ॥
पीतांबराची कास गे कसिली सावकाश गे। नारद तुंबर गायन करती पुढे निजदास गे॥३॥
भक्त कृपेची माय गे वोळखिली विठाई गे। एका जनार्दनी विटे जोडियेले पाय गे॥४॥

(१५९)

[४] अधरी धरूनि वेणू। वाजविला कोणी नेणू॥धृ॥
प्रातःकाळी तो वनमाळी। घेऊनि जातो धेनु॥२॥
उभी मी राहे वाट मी पाहे। केव्हा भेटेल मम कान्हु॥३॥
एका जनार्दनी वाजविला वेणु। ऐकता मन झाले तल्लीनु॥४॥

(१६०)

[५] गौळणी गा-हाणे सांगती यशोदेशी। दही दुध खाऊनिया पळुनी जातो ह्रषीकेशी॥१॥
लाडका हा कान्हा बाई तुझा तुला गोड वाटे। याच्या खोडी किती सांगू महीपत्र सिंधु आटे॥धृ॥
मेळवोनि गोपाळ घरामध्ये शिरे कान्हा। धरू जाता पळुनि जातो यादवांचा राणा॥३॥
ऐसे मज याने पिसे लावियेले सांगू काई। एका जनार्दनी कायावाचामने पायी॥४॥

(१६१)

[६] ऐके ऐके बाई यशोदे। नवल केले तुझ्या गोविंदे।
आमुची मुले तुडविली पदे। आता यासी बांधीन॥१॥
आवरी आवरी अपुला कान्हा। नाशियल्या आमुच्या सुना।
अझुनि लाज नये तुझ्या मना। तुझा तुला गोड वाटे कान्हा॥धृ॥
येतो आमुचे घरासी। धमकावितो लेकीसुनासी।
कोठे लोणी सांग आम्हासी। न सांगता वासुरे सोडी ब्रिदीसी॥३॥
आपण खातो दही दुध लोणी। हात पुसतो सुनेच्या मुखालागुनी।
एका जनार्दनी करी करणी। जातो पळोनि तेथोनि॥४॥

(१६२)

[७] दही दुध चोरोनि दे सर्वांना ऐसे मज सांगताती। ते न ऐकिले म्हणोनि मजवरी रूसले ग सांगाती॥१॥
आई मज मारू नको। नाही नाही म्या पाहिली माती॥धृ॥
बळिराम दादा मज भेटला तोही माझा पक्षपाती। एका जनार्दनी पुर्णकृपेने आम्ही भजो दिनराती॥३॥

(१६३)

[८] तुझ्या मुरलीची ध्वनी। अकल्पित पडली कानी।
विव्हळ झाले अंतःकरणी। मी घरधंदा विसरलो॥१॥
अहा रे सावळीया कैशी वाजविली मुरली॥धृ॥
मुरली नोहे केवळ बाण। तिने हरिला माझा प्राण।
संसार केला दाणादीन। येऊनि ह्रदयी संचरली॥३॥
तुझ्या मुरलीचा सुरतान। मी विसरले देहभान।
घर सोडोनि धरिले रान। मी वृंदावना गेले॥४॥
एका जनार्दनी गोविंदा। पतितपावन परमानंदा।
तुझ्या नामाचा मज धंदा। वृत्ति तव पदी निर्वतली॥५॥

(१६४)

[९] दुडीवरी दुडी गौळणी साते निघाली। गौळण गोरस म्हणो विसरली॥१॥
गोविंदु घ्या कोणी दामोदरू घ्या गे। तव तव हासती मथुरेच्या गे॥धृ॥
दुडिया माझारी कान्होबा झाला भारी। उंचबळे गोरस सांडे बाहेरी॥३॥
एका जनार्दनी सबलस गौळणी। ब्रह्मानंदु न समाये मनी॥४॥

(१६५)

[१०] सांवळा देखिला नंदाचा। तेणे आनंदाचा पुर आला॥धृ॥
काळी घोंगडी हातामध्ये काठी। चारितो यमुनातटी गोधने तो॥२॥
एका जनार्दनी सावळा श्रीकृष्ण। गौळणी तल्लीन पाहाता होती॥३॥

श्री नामदेवरायांच्या गवळणी

(१६६)

[१] परब्रह्म निष्काम तो हा गौळिया घरी। वाक्या वोळे अंदु क्रष्ण नवनीत चोरी॥धृ॥
म्हणती गौळणी हरिची पाऊले धरा। रांगत रांगत येतो हरि हा राजमंदिरा॥२॥
लपत छपत येतो हरि हा राजभुवनी। नंदासी टाकुनि आपण बैसे सिंहासनी॥३॥
सापडला देव्हारी यासी बांधा दाव्यांनी। शंख चक्र गदा पद्म शारंगपाणी॥४॥
बहुता कष्टे बहुता पुण्ये जोडिले देवा। अनंत पवाडे तुमचे न कळती मावा॥५॥
नामा म्हणे केशवा अहोजी तुम्ही दातारा। जन्मोजन्मी द्यावी तुमची चरणसेवा॥६॥

(१६७)

[२] हाती घेऊनिया काठी। शिकविते श्रीपती। यमुनेची माती। खासी का का का का॥१॥
हरि तु खोड्या नको करू। माझ्या बा बा बा बा॥धृ॥
धाऊनिया धरिला करी। बैसविला मांडीवरी। मुख पसरोनि करी। आ आ आ आ॥३॥
विष्णुदास नामा म्हणे। मरोनिया जन्मा येणे। कृष्ण सनातन पाहु। या या या या॥४॥

(१६८)

[३] हरि तुझी ऐसी कैसी हे खोड॥धृ॥
घेऊनि चिमुटे मुलासी पळसी। गोपी तुज म्हणती हा दोड॥२॥
सोडूनि वासरे गाईसी पाजिसी। यात तुज काय मिळती जोड॥३॥
आडवा होऊनि गोपीसी धरिसी। चुंबिता वदन मज म्हणसी सोड॥४॥
अशा ह्या चेष्टा नाम्यासी करिसी। हरि तुझी ऐसी कैसी हे खोड॥५॥

(१६९)

[४] ध्यान सावळे गे गोकुळीचे। धाव पाव वेगी हरि सावळिया॥धृ॥
सावळीसी अंगी उटी। सावळी कस्तुरी लल्लाटी।
सावळिसी कासे कासियला कटी। गोवळिया॥२॥
सावळीसी तनु बरवी। सावळे वृंदावन मिरवी।
सावळ्याशा तुळसी कानी। मंजुरिया कोवळिया॥३॥
सावळीसी कंठी माळा। सावळे ह्रदयी पदक विशाळा।
सावळ्याशा गोपी केल्या ओवळ्या। गोवळिया॥४॥
सावळिसी हाती काठी। सावळासा कांबळा पाठी।
नामयाचा स्वामी राखी। धवळ्या आणि पिवळ्या॥५॥

(१७०)

[५] यशोदे घराकडे चाल मला जेवू घाल॥धृ॥
साध्या गव्हाची पोळी लाटी। मला पुरणपोळी करून दे मोठी।
नाही अडवित गुळासाठी। मला जेवू घाल॥२॥
तुप लावुन भाकर करी। वांगे भाजून भरीत करी।
वर कांद्याची कोशिंबिरी। मला जेवू घाल॥३॥
आई गे खडीसाखरेचे खडे। लवकर मला करून दे वडे।
बाळ स्फुंदस्फुदोनी रडे। मला जेवू घाल॥४॥
आई लहानच घे गे उंडा। लवकर भाजुन दे मांडा।

लांब गेल्या गाईच्या झुंडा। मला जेवु घाल॥५॥
आई मी खाईन शिळा घाटा। दह्याचा करून दे मठ्ठा।
नाही माझ्या अंगी ताठा। मला जेवू घाल॥६॥
भाकर बरीच गोड झाली। भक्षुनी भुक हारपली।
यशोदेने कृपा केली। मला जेवू घाल॥७॥
आई मी तुझा एकुलता एक। गाई राखितो नऊ लाख।
गाई राखुनि झिजली नखं। मला जेवू घाल॥८॥
नामा विनवी केशवासी। गाई राखितो वनासी।
जाऊन सांगा यशोदेसी। मला जेवू घाल॥९॥

(१७१)

[६] रात्री काळी घागर काळी। यमुनाजळे ही काळी वो माय॥१॥
बुंथ काळी बिलावर काळी। गळा मोती एकावळी काळी वो माय॥धृ॥
मी काळी कांचोळी काळी। कास कासिली ते काळी वो माय॥३॥
एकुली पाणिया नच जाय साजणी। सवे पाठवा मुर्ती सावळी वो माय॥४॥
विष्णुदास नाम्याची स्वामिनी काळी। कृष्णमुर्ती बहु काळी वो माय॥५॥

(१७२)

[७] गोपाळांशी खेळती। आनंदे डोलती। कृष्ण आमुचा सांगाती। डो डो डो डो॥१॥
कान्होबाची संगती। ब्रह्मादिक इच्छिती। धन्य आम्हा म्हणविती। अ ल ल ल ल॥धृ॥
कृष्णाप्रती गोपाळ। म्हणताती सकळ। अकळशी नाकळ। हा त त त त॥३॥
मामा मारू गेलासी। आपटिले गजासी। मल्लयुद्ध खेळलासी। हु तु तु तु तु॥४॥
अजगर मारिला। वडवानळ गिळीला। गोवर्धन उचलिला। अ ब ब ब ब॥५॥
पुतनेसी शोषिले। नारदासी मोहिले। गणिकेसी उद्धरिले। अ रे रे रे रे॥६॥
गौळियाचे घरा जाशी। दही दुध लोणी खाशी। त्यांच्या सुना भोगिसी। छि छी छी छी छी॥७॥
सोळा सहस्त्र भोगिशी। ब्रह्मचारी म्हणविशी। लटिकेचि ठकविशी। कु लु लु लु लु॥८॥
सोडूनिया मीपण। आम्हा घाली लोटांगन। परब्रह्म नारायण। आ हा हा हा हा॥९॥
ऐसे तुझे पवाडे। वर्णिताती वाडेकोडे। विष्णुदास नामा म्हणे। यु यु यु यु॥१०॥

(१७३)

[८] कान्होबा निवडी आपुली गोधने॥धृ॥
पाच पोळ्या तीन भाकरी। दीड कानवला एक पुरी।
आम्हा धाडिले वैल्या दुरी। आमची ठकऊन खाल्ली शिदोरी॥२॥
परियेसी शारंगधरा। तुझा बैल चुकला मोरा।
सांगु गेलो तुझ्या घरा। पाठी लागला तुझा म्हातारा॥३॥
परियेसी ह्रषीकेषी। गाईम्हशींचे दुध पिशी।
वासरे प्याली म्हणुन सांगशी। उद्या ताक नाही आम्हासी॥४॥
कान्होबा ओढाळ तुझ्या गाई। होत्या नव्हत्या कळंबा ठायी।
शिव्या देती तुझी आई॥५॥
विष्णुदास नामा साहे। देवा तुचि बाप माये।
अखंड माझे ह्रदयी राहे॥६॥

(१७४)

[९] देहुडा चरणी वाजवितो वेणु। गोपिकारमणु स्वामी माझा॥१॥
देखिला गे माय यमुनेचे तीरी। हात खांद्यावरी राधिकेच्या॥धृ॥
गुंजावर्ण डोळे शिरी बाबर झोटी। मयुर पिच्छ वेष्ठी शोभतसे॥३॥
सगुण मेघःश्याम लावण्य सुंदर। नामया दातार केशवराज॥४॥

(१७५)

[१०] गड्यांनो राजा की रे झाला। कृष्ण सिंहासनी बैसला॥धृ॥
पावा मोहरी घोंगडी। आम्ही खेळू यमुने थडी।
नाचा पाऊला देहुडी। कृष्ण आमुचा की रे गडी॥२॥
खेळू हुतुतु हुंबरी। थडक हाणो टिरीवरी।
आता चालिला दळभारी। आमुचे यशोदेचा हरि॥३॥
कुस्ती खेळता कासाविसी। शेंबुड खरकटे नाकासी।
कडे घेऊ सावकाशी। आता बहु भितो यासी॥४॥
आम्ही तुम्ही सवे जाऊ। गाई वळावया जाऊ।
त्याचे मानेत बुक्या देऊ। जवळी जावयासी भिऊ॥५॥
नामा म्हणे चला जाऊ। हात जोडोनी उभे राहु।
पाया पडून मागून घेऊ। जनीवनी तो कृष्णचि ध्याऊ॥६॥

श्री निळोबारायांच्या गवळणी

(१७६)

[१] एकी एकटेचि असोनि एकला। विश्वी विश्वाकार होऊनिया ठेला।
जयापरी वो तैसाचि गमला। नंदनंदन हा आचोज आंबुला वो॥१॥
ऐशा गौळणी त्या बोलती परस्परी। करूनि विस्मय आपुल्या अंतरी।
विश्वलाघवीया हाचि चराचरी। नेणो महिमा यासी म्हणो व्याभिचारी वो॥धृ॥
गिरी गोवर्धन येणे उचलिला। काळिया महासर्प नाथुनि आणिला।
जळत वणवा वो मुखेचि प्राशीला। गिळिता अघासुर चिरूनि सांडिला वो॥३॥
कपट्या माभळभटा दिल्हे पिढे दान। शोषिली पूतना विषे पाजिताचि स्तन।
उखळि बांधिता उपटिले विमळार्जुन। भक्षुनि मृत्तिका वदनी दाविली भुवने वो॥४॥
आणखी एक येणे नवलावो केला। काला वाटिता वो विधाता ठकविला।
भाग नेदिता तो वत्से गोवळ घेऊनि गेला। तैसाचि आपन येथे होऊनिया ठेला वो॥५॥
इंद्र चंद्र महेंद्र यातेचि पुजिती। श्रुति शास्त्रे तेही यातेचि स्तविती।
महासिद्ध मुनि ध्यानी आराधिती। निळा म्हणे तो हा जोडला सांगाती वो॥६॥

(१७७)

[२] येकले न कंठेचि म्हणोनिया येणे। केली निर्माण वो चौदाही भुवने।
गगन चंद्र सुर्य मेघ तारांगणे। पाचही महाभुते भोतिके भिन्ने भिन्ने वो॥१॥
ऐसा लाघविया मायासुत्रधारी। येकला येकटाचि झाला नानाकारी।
स्थुळ सुक्ष्म जीव जीवाचे अंतरी। तो हा नंदनंदन सये बाळब्रह्मचारी वो॥धृ॥
याचिये नाभिकमळे जन्म चतुरानना। याचिया निजप्रभा प्रकाश रविकिरणा।
याचिया महातेजे तेज हुताशना। येणेचि पढवुनि वेद केला शहाणा वो॥३॥
याचिया द्रावपणे समुद्रासी जळ। याचिया चपळपणे पवन हा चंचळ।
याचिये अवकाशे पघळ। याचिया धृतिबळे अवनि ही अढळ वो॥४॥
येणेचि मेरूस्तंभे अचळ धरियेला। दिशा दिग्पाळासी येणेचि ठाव दिधला।
विधिविधानाचा शास्त्रा बोध केला। येणेचि सुरपती स्वर्गी बैसविला॥५॥
भोगुनि अंगना हा बाळ ब्रह्मचारी। येकला जये तेथे सोळा सहस्त्र घरी।
आम्हा तुम्हा भोगुनि अलिप्त मुरारी। निळा म्हणे ऐशा विवादति नारी वो॥६॥

(१७८)

[३] नव्हते एक ना दुसरे काही यासी। होता लपोनिया आपुलिये कुसी।
काहीचि नोळखोनि आपआपणासी। तोची येऊनि येथे झाला अविनाशी वो॥१॥
रूप धरिले सगुण चांगले। ठाण माण जेथील तेथेच राखीले
चतुर्भुजशंखचक्राते मिरविले। मुगुटमाळा श्रवणी सुतेज कुंडले वो॥धृ॥
नव्हता गावसीव पहिला यासि काही। नामरुपासि तो आधीचि ठाव नाही।
म्हणती वैंकुठ ते कालचि झाले बाई। क्षीरसागर ना कैंचि शेषशाई वो॥३॥
नव्हता काळा गोरा खुजा ना ठेंगणा। स्वरूप सुंदर ना आंधळा देखणा।
कैंचि जीव शिव तयासी भावना। पंच भौतिक ना नेणे पंचप्राणा वो॥४॥
नव्हता मन बुद्धि इंद्रियांचा मेळा। कार्य कर्तृत्व हा कारणा वेगळा।
येणे जाणे यासि नव्हते कवण्या काळा। तोचि आला या नंदाच्या राउळा वो॥५॥
यासि जीवे भावे धरा घाला मिठ्या। ऐशा बोलती गौळणी गोरट्या।
निळा म्हणे अवघ्या मिळोनि लहाना मोठ्या। यासि चुकती त्या अभाग्या करंट्या वो॥६॥

(१७९)

[४] शुकादिकाचिये ह्रदयीचे ध्यान। आम्हा जोडले वो न करिता साधन।
सहजचि पाचारिता येतसे धावोन। प्रेमे आलिंगिता निवे तनु मन वो॥१॥
ऐशा गौळणी आनंद भरिता। दृष्टी अवलोकुनि मदनाचिया ताता।
म्हणती धन्य भाग्य आमुचे वो आता। लाधलो जन्म झाली कृतचि कृत्यता वो॥धृ॥
नित्य हरिचिया समागमे बाई। नाही देखिले ते सूख भोगु देही।
प्रारब्ध संचित क्रियमाण तेही। गेले हारपोनिया ठाईचे ठाई वो॥३॥
येता जाता नेणो काळाचा आडदरा। देखता सन्मुख तो पळतुसे माघारा।
रंग श्रीरंगाचा उमटला शरीरा। तेणे वाताहत जन्मदुःख जरा वो॥४॥
हरिचे सन्निधी वो सहवासे वर्तता। यासि बोलता चालता कृष्ण खेळता।
अंगी ऐश्र्वर्याची दृढावली सत्ता। तेणे अजरामर झालो असो निभ्रांता वो॥५॥
ऐशा कृष्णरूपी रूपसा बाळा। होऊनि स्तविती पूजिती वेळोवेळा।
कडिये खांदिये घेऊनि घननीळा। निळ्या स्वामीते अवलोकिती डोळा वो॥६॥

(१८०)

[५] नित्यानंदापुढे आनंद तो कोण। विषयसुख बाई बापुडे ते क्षीण।
जेथे न सरेची वैकुंठसदन। शेषशायी त्रिकुटभुवन वो॥१॥
नेघो म्हणोनिया त्यागिती परौते। घेऊ संगसुख हरिच्या सांगाते।
गाऊ वानू रूप पाहोनि निरूते। हासो खेळो ठायी जेववू सांगाते वो॥धृ॥
नेघो समाधीचे सूक तुच्छ वाटे। नित्यानित्याचिये न पडो खटपटे।
काय करू ते तपाचे बोभाटे। एका हरिविण अवघी ते फलकटे वो॥३॥
काय जाऊनिया करू निजधामा। तेथे मी नातुडे नाढळे विश्रामा।
येथे सांडुनिया तमालमेघःश्यामा। नेघो नाईको आणिका दुर्गमा वो॥४॥
स्वर्गभोग ते ही न लागती असार। क्षणे होती जाती क्षणेचि नैश्र्वर।
येथे हरिसंगे क्रीडो निरंतर। सर्वही सुखाचे हा जोडला आगर वो॥५॥
निळा म्हणे नित्य निःसीम स्वानुभवे। ऐशा गोपिका त्या रंगल्या हरिसवे।
अधिकाधिक हे प्रेम त्यांचे नवे। जाणोनि आवडी ते पुरविली देवे वो॥६॥

(१८१)

[६] वेणु वाजवीत यमुनेच्या तटी। उभा कान्हया सावळा जगजेठी।
भोवती गोधने वो गोवळाच्या थाटी। ऐकोनि गौळणी धावती उठाउठी वो॥१॥
ऐसा जनमन मोहन रंजवणा। गुणी गुणातीत नंदाचा पोसणा।
करूनि अकर्ता हा सृष्टयादि रचना। विश्वी विश्वातीत अलक्ष देखणा वो॥धृ॥
बैसोनि विमानी याच्या पाहो येति खेळा। देव सकळही मिळोनिया पाळा।
वोघ कुंठित या यमुनाजळा। वरूषे ब्रह्मानंद नरनारी बाळा वो॥३॥
जळचर भूचर वनचरे। लुब्ध होऊनिया वेणूचिया स्वरे।
राहिली तटस्थचि मानसे शरीरे। नेणती वैरभाव एकत्र परस्परे वो॥४॥
पवन निश्चळचि होऊनिया ठेला। सूर्य अस्तमाना जाऊ विसरला।
वत्से न पिती देहभाव गेला। मुखीचा कवळ गाईमुखीचि राहिला वो॥५॥
ऐसा स्वानंदाचा आला महापुर। कृष्ण वेणुध्वनी लाधले अंतर।
नेत्री गळताती प्रेमाचे पाझर। निळा म्हणे देही देहा अनावर वो॥६॥

(१८२)

[७] भावभक्तिचिया प्रीति जेवविला। देऊनि ढेकर वो पुर्णपणे धाला।
नेणो आनंदाचा प्रवाह लोटला। ऐसिया स्वानंदाची वचने अनुवादला वो॥१॥
म्हणे केले ते पावले उपचार। तुम्ही आवडीने प्रेमाचे प्रकार।
झाली तृप्ति आता घ्यावो देतो वर। पुन्हा नातळो हा तुम्हासि संसार वो॥धृ॥
तांतल्या सोसूनिया विरक्तिच्या ज्वाळा। बरव्या शिजविल्या समृद्धी सकळा।
झाला रसस्वाद भोजनी आगळा। वाढिली पंचामृते जेवता जे वेळोवेळा वो॥३॥
ऐसे जेऊनिया धाले विश्वंभर। भक्ता उभारिला अभयाचा कर।
काढुनी घालितो कंठीचे तुळसीहार। निळ्या स्वामी गौरविती वारंवार वो॥४॥

(१८३)

[८] बोलती चालती देखती ऐकती। सर्वत्री श्रीपती त्यांचे दृष्टि॥१॥
सासुरे माहेर सासु सासरा दीर। देखती त्या भ्रतार हरिच्या रूपे॥धृ॥
सोयरे सज्जन इष्ट मित्रजन। कन्या कुमरे धन कृष्ण गोत॥३॥
निळा म्हणे त्यांचे संपत्ति वैभव। पश्वादिक सर्व झाला कृष्ण॥४॥

(१८४)

[९] मृदु मधुर वाजवीत वेणु। सावळा नंदनु नंदाचा॥धृ॥
तेणे गोपिका वेधलिया। पात्र झाल्या ब्रह्मसुखा॥२॥
रंजविल्या विनोदवचनी। हास्य करूनि हासवितु॥३॥
निळा म्हणे त्यांचिया गळा। घाली वेळोवेळा कर पल्लव॥४॥

श्री संत सेना महाराजांच्या गवळणी

(१८५)

[१] जाती मिळोनी पाच सात गवळणी। गोरस विकू मथुरे लागोनी।
वाट आडवोनी दान मागे चक्रपाणी॥धृ॥
सोडी सोडी मज जाऊ दे हरि। नको वाटे आडवू म्हणे मुरारी।
घरी जावा नणंदा जाचिती की भारी॥२॥
म्हणती गवळणी हरिसी हसुनी। देऊ तुज लागी नवनीत चोरूनी।
जाऊ पाहती ठकवुनि हरिसी गवळणी॥३॥
ब्रह्मांडांचा नायक म्हणे गोपिकांसी। ब्रह्मज्ञानी महान चाळविले ऋषी।
गाई गोपाळ चोरिले नाडिले ब्रह्मासी॥४॥

भक्तीभावे गवळणी रिघाल्या शरण। वृत्तिसहित बिंबल्या अवघ्या परिपूर्ण।
सेना म्हणे विसरल्या कार्य आठवण॥५॥

(१८६)

[२] गोपाळांसहित वनमाळी। गाई चारीत कळंबातळी।
शिदोरी आणिल्या सकळी। मधी वनमाळी बैसला॥१॥
गोपाळ म्हणती कृष्णासी। वाटा देई ज्याचा त्यासी।
नेदी अधिक उणे कोणासी। द्वैत तुजपासी असेना॥धृ॥
हरि म्हणे गोपाळांसी। सांगतो ते धरा मानसी।
नीरे ठेवा मजपाशी। दुरी ताकासी सांडावे॥३॥
ऐसे सांगुनिया हरि। शिदोरी सोडिल्या झडकरी।
सुरवर पाहता आंबरी। वाकुल्या हरि दावीतु॥४॥
सेना म्हणे गा श्रीहरि। टोंकत बैसलेसे दारी।
देई कवळ झडकरी। माझी न करी उपेक्षा॥५॥

(१८७)

[३] पावा घोंगडी घेऊनी पायी। संगे गोपाळ घेऊनी गाई।
वृंदावनी आले लवलाही। वेणु वाजविला सुस्वरे बाई वो॥१॥
उताविळ झाल्या गौळणी। वेणुनाद पडियेला कानी।
भोवती पाहाती अवलोकूनी। नयनी न दिसे सारंगपाणि वो॥धृ॥
विसरल्या कामधंदा। सासु सासऱ्याची नाही मर्यादा।
कोण जावा कोण त्या नणंदा। वृत्ति वेधिली परमानंदा॥३॥
अवघा हरपला देहभाव। जन्म मरणाचा पुसियेला ठाव।
वृत्ति स्वानंदे मुराली पहा वो। सेना म्हणे भाग्य उदये वो॥४॥

श्री संत मीराबाईंच्या गवळणी

(१८८)

[१] कान्हा बनसरी बजाय गिरधारी। तोरि बनसरी लागी मोको प्यारी॥धृ॥
दही दुध बेचने जाती जमुना। कानाने घागरी फोरी॥२॥
सिरपर घट घटपर झारी। उसकु उतार मुरारी॥३॥
सास बुरी रे ननंद हटेली। देवर देवे मोको गारी॥४॥
मीरा कहे प्रभु गिरीधर नागर। चरणकमल बलहारी॥५॥

(१८९)

[२] हरि गुण गावत नाचुंगी॥धृ॥
आपने मंदिर मे बैठ बैठकर। गीता भागवत वाचुंगी॥२॥
ग्यान ध्यानकी गठडी बांधकर। हरिहर संग मे लागूंगी॥३॥
मीरा के प्रभु गिरीधर नागर। सदा प्रेमरस चाखुंगी॥४॥

(१९०)

[३] तुम बिन मोरी कौन खबर ले। गोवर्धन गिरिधारी रे॥धृ॥
मोर मुकुट पीतांबर सोहे। कुंडल की छब न्यारी॥२॥
भरी सभा मे द्रौपदी ठारी। राखो लाज हमारी रे॥३॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर। चरनकमल बलहारी रे॥४॥

(१९१)
[४] पग घंगरु पग घुंगरु बांधकर नाची रे॥धृ॥
मैं तो अपने नारायण की। हो गई आपही दासी रे॥२॥
विष का प्याला राजाजी ने भेजा। पीबत मीरा दासी रे॥३॥
लोक कहै मीरा भई रे बावरी। बाप कहै कुलनासी रे॥४॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर। हरिचरणकी दासी रे॥५॥
(१९२)
[५] माई मैने गोविंद लीन्हो मोल॥धृ॥
कोई कहै हलका कोई कहै भारी। लियो है तराजू तोल॥२॥
कोई कहै ससता कोई कहै महेंगा। कोई कहै अनमोल॥३॥
ब्रिंदावन के जो कुंजगलीनमो। लीयो है बजाके ढोल॥४॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर। पुरव जनमके बोल॥५॥
(१९३)
[६] लाज रखो तुम मेरी। प्रभुजी लाज रखो तुम मेरी॥धृ॥
जब बैरीने कबरी पकरी। तबही मान मरोरी॥२॥
मै गरीब तुम करुणासागर। दुष्ट करत बलजोरी॥३॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर। तुम पिता मै छोरी॥४॥
(१९४)
[७] नंद दुवारे एक जोगी आयो। शिंगी नाद बजायो।
शीश जटा शशी वदन। सोहाये अरुण छबि ढायो॥धृ॥
रोवत खिजत कृष्ण सांवरो रहत नही हुलरायो।
लियो उठाय गोद नंदरानी द्वारे जाय दिखायो॥२॥
अलख अलख करी लियो गोद मे चरन चुमि उर लायो।
श्रवण लाग कूछू मंत्र सुनायो हसी बालक किलकायो॥३॥
चिरंजीवो सुत भहरी तिहारो जोगी सूख पायो।
सुरदास रमि चल्यो सांवरो संकर नाम बतायो॥४॥

श्री संत ज्ञानोबारायांच्या गवळणी

(१९५)
[१] योगिया मुनिजना ध्यानी। ते सुख आसनी शयनी॥१॥
हरि सुख फावले रे॥धृ॥
गोकुळीच्या गौळिया। गोपी गोधना सकळा॥३॥
बापरखुमादेवीवरू विठ्ठले। ते सुख सवंगडिया दिधले॥४॥
(१९६)
[२] माझ्या कान्हाचे तुम्ही नाव भरी घ्या वो। ह्रदयी धरोनी यासि खेळावया न्या वो॥धृ॥
भक्ताकारणे येणे घेतलीसे आळी। दहा गर्भवास सोसी वनमाळी॥२॥
कल्पनेविरहित भलतया मागे। अभिमान सांडूनि दीनापाठी लागे॥३॥
शोषिली पूतना येणे मोहिले लेकरू। आळी न संडी बापरखुमादेविवरू॥४॥

(१९७)

[३] त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनिया माये। कल्पद्रुमातळी वेणु वाजवित आहे॥१॥
गोविंदु वो माये गोपाळु वो। सबाह्य अभ्यंतरी अवघा परमानंदु वो॥धृ॥
सावळे सगुण सकळ जिवाचे जीवन। घनानंद मुर्ति पाहता हारपले मन॥३॥
शून्य स्थावर जंगम व्यापूनि राहिला अकळ। बापरखुमादेविवरू विठ्ठलु सकळ॥४॥

(१९८)

[४] बरवा वो हरि बरवा वो। गोविंद गोपाळ गुण गरूवा वो॥धृ॥
सावळा वो हरि सावळा वो। मदनमोहन कान्हो गोवळा वो॥२॥
पाहता वो हरि पाहता वो। ध्यान लागले या चित्ता वो॥३॥
पढिये वो हरि पढिये वो। बापरखुमादेविवरू घडिये वो॥४॥

(१९९)

[५] काय सांगु तूते बाई। काय सांगु तूते॥धृ॥
जात होते यमुने पाणिया वातत भेतला सावला। दोईवल तोपी मयुल पुछाची खांद्यावली कांबला॥२॥
तेणे माझी केली तवाली मग मी तेथून पलाली। पलता पलता घसलुन पलली।
दोईची घागल फुतली॥३॥
माझे गुलगे फुतले मग मी ललत बथले। तिकुन आले शालंगपाणी मला पोताशी धलिले॥४॥
मला पोताशी धलिले माझे समाधान केले। निवृत्तीचे कृपे हे सुख ज्ञानदेवा लाधले॥५॥

(२००)

[६] दुडीवर दुडी गौळणी साते निघाली। गौळणी गोरस म्हणो विसरली॥१॥
गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो। तव तव बोलती मथुरेच्या वो॥धृ॥
गोविंद गोरसू एकचि नावा। गोरसु विकु आले तुमच्या गावा॥३॥
बापरखुमादेविवर विठ्ठलेसी भेटी। आपुले संवसाठी करुनी ठेला॥४॥

(२०१)

[७] यातिकुळ माझे गेले हारपोनि। श्रीरंगावाचूनी अणु नेणे॥१॥
किती वो शिकवाल मज वेळोवेळा। मी तया गोवळा रातलिये॥धृ॥
अष्टभोग भोगणे माते नाही चाड। भक्तिप्रेम गोड लेइले गे माये॥३॥
बापरखुमादेविवरु जीवीचा जिव्हाळा। काही केलिया वेगळा नव्हे गे माये॥४॥

(२०२)

[८] जीवीचिया जीवा प्रेमभावाचिया भावा। तुजवाचुनी केशवा अनु नावडे॥१॥
जीवे अनुसरलिये अझूनि का न ये। वेगी तो सये प्राणु माझा॥धृ॥
सौभाग्य सुंदरु लावण्यसागरु। बापरखुमादेविवरु श्रीविठ्ठल॥३॥

(२०३)

[९] सावळे परब्रह्म आवडे या जिवा। मने मन राणिवा घर केले॥१॥
काय करु सये सावळे गोवित। आपेआप लपत मन तेथे॥धृ॥
बापरखुमादेविवरु सावळी प्रतिमा। मने मनी क्षमा एक झाले॥३॥

(२०४)

[१०] पाचासहित लयातीत झालिये वो। प्रेमभक्ति अनुसरले वो काळ्या रूपासी॥१॥
ठायीचाची काळा अनादि बहु काळा। म्हणोनि वेदा चाळा लाविला गे माये॥धृ॥
बापरखुमादेवीवरे जन्मा वेगळे पै केले। म्हणोनि भाज झाले बाईये वो॥३॥

(२०५)

[११] सुखाचा निधी सुखसागर जोडला। म्हणोनि काळा दादुला मज पाचारी गे माये॥१॥
प्रेम नव्हाळी मज झाली दिवाळी। काळे वनमाळी आले घरा गे माये॥धृ॥
बापरखुमादेविवर पुरोनि उरला। सबाह्यजु भरला माझे ह्रदयी गे माये॥३॥

विनवणीचे अभंग

(२०६)

[१] संतभार पंढरीत। किर्तनाचा गजर होत॥१॥
तेथे असे देव उभा। दिसे समचरणाची शोभा॥धृ॥
रंग भरे किर्तनात। प्रेमे हरिदास नाचत॥३॥
सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचा जो जिव्हार॥४॥
ऐशा संता शरण जावे। जनी म्हणे त्याला ध्यावे॥५॥

(२०७)

[२] कृपाळू सज्जन तुम्ही संतजन। हेचि कृपादान तुमचे मज॥१॥
आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा। कीव माझी सांगा काकुळती॥धृ॥
अनाथ अपराधी पतित आगळा। परि पाया वेगळा नका करु॥३॥
तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी। मग मज हरि उपेक्षीना॥४॥

(२०८)

[३] संताचिया पायी हा माझा विश्वास। सर्वभावे दास झालो त्यांचा॥१॥
तेचि माझे हित करिती सकळ। जेणे हा गोपाळ कृपा करी॥धृ॥
भागलिया मज वाहतील कडे। त्यांचियाने जोडे सर्व सुख॥३॥
तुका म्हणे शेष घेईन आवडी। वचन न मोडी बोलिले ते॥४॥

(२०९)

[४] तुमचिये दासीचा दास करूनि ठेवा। आशिर्वाद द्यावा हाचि मज॥१॥
नवविधा काय बोलली जे भक्ति। द्यावी माझ्या हाती संतजनी॥धृ॥
तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारे। उतरेन खरे भवनदी॥३॥

(२१०)

[५] ठाकलोसे द्वारी। उभा याचक भिकारी॥१॥
मज भीक काही देवा। परेम भातुके पाठवा॥धृ॥
याचकाचा भार। घेऊ नये येरझार॥३॥
तुका म्हणे दान। सेवा घेतल्या वाचुन॥४॥

(२११)

[६] हेचि जतन करा दान। धरूनि चरण राहिलो ते॥१॥
घ्यावी माझ्या हाते सेवा। हेचि देवा विनवणी॥धृ॥
आणिक काही न घाली भार। बहुत फार साकडे॥३॥
तुका तुमचा म्हणवी दास। त्याची आस पुरवावी॥४॥

(२१२)

[७] शेवटीची विनवणी। संतजनी परिसावी॥१॥
विसर तो न पडावा। माझा देवा तुम्हासी॥धृ॥
पुढे फार बोलो कायी। अवघे पायी विदित॥३॥
तुका म्हणे पडिलो पाया। करा छाया कृपेची॥४॥

(२१३)
[८] द्वारपाळ विनंती करी। उभे द्वारी राउळा॥१॥
आपुलिया शरणागता। वाहो चिंता न द्यावी॥धृ॥
वचना या चित्त द्यावे। असो ठावे तुम्हासी॥३॥
तुका म्हणे कृपासिंधु। दीनबंधु केशवा॥४॥
(२१४)
[९] असो मंत्रहीन क्रिया। नका चर्या विचारु॥१॥
सेवेमधी जमा धरा। कृपा करा शेवटी॥धृ॥
विचारूनि ठायाठाय। येथे भाव राहिला॥३॥
आता तुकयापाशी हेवा। नाही देवा तातडी॥४॥
(२१५)
[१०] आता घेई माझे। भार सकळही ओझे॥१॥
काय करिसी होई वाड। आलो पोटासी दगड॥धृ॥
तुचि डोळे वाती। होई दीपक सांगाती॥३॥
तुका म्हणे काही। विचाराया चाड नाही॥४॥
(२१६)
[११] पाहे पा ध्वजेचे चिरगुट। राया जतन करिता कष्ट॥१॥
तैसा मी एक पतित। परि तुझा मुद्रांकित॥धृ॥
मसीपत्र ते केवढे। रावो चालवीआपुल्या पाडे॥३॥
बापरखुमादेवीवरदा। सांभाळावे आपल्या ब्रिदा॥४॥

॥भजन॥
॥ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम॥

प्रार्थना

(२१७)
[१] हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥१॥
गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी॥धृ॥
न लगे मुक्ति आणि संपदा। संत संग देई सदा॥३॥
तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी॥४॥
॥भजन॥
॥विठ्ठल जय जय विठ्ठल॥

(२१८)
[२] बोलिली लेकुरे। वेडी वाकुडी उत्तरे॥१॥
करा क्षमा अपराध। महाराज तुम्ही सिद्ध॥धृ॥
नाही विचारिला। अधिकार म्या आपुला॥३॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पाया पै किंकरा॥४॥
॥भजन॥
॥ज्ञानदेव तुकाराम॥

(२१९)
[३] झाले समाधान। तुमचे देखिले चरण॥१॥
आता उठावेसे मना। येत नाही नारायणा॥धृ॥
सुरवाडिकपणे। येथे सापडले केणे॥३॥
तुका म्हणे भोग। गेला निवारला लाग॥४॥
(२२०)
[४] करुनि आरती। आता ओवाळु श्रीपती॥१॥
आजि पुरले नवस। धन्य काळ हा दिवस॥धृ॥
पाहा वो सकळा। पुण्यवंत तुम्ही बाळा॥३॥
तुका वाहे टाळी। उभा सन्निध जवळी॥४॥
(२२१)
[५] प्रेम सप्रेम आरती। गोविंदाते ओवाळिती॥१॥
धन्य धन्य ते लोचन। नित्य करिती अवलोकन॥धृ॥
बाळा प्रौढा आणि मुग्धा। ओवाळीती परमानंदा॥३॥
नामा म्हणे केशवाते। देखुनि राहिलो तटस्थ॥४॥

आरत्या

(२२२)
[१] सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची। कंठी शोभे माळा मुक्ताफळांची॥१॥
जयदेव जयदेव जय मंगलमुर्ती। दर्शनमात्रे मनकामनापुर्ति॥धृ॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुमकुम केशरा।
हिरे जडित मुकुट शोभतो बरा। रुणझुणती नुपूरे चरणी घागरिया॥३॥
लंबोदर पितांबर फणिवर बंधना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना। संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना॥४॥
(२२३)
[२] लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा। विषे कंठी काळा त्रिनेत्री ज्वाळा।
लावण्य सुंदर मस्तकी बाळा। तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा॥१॥
जयदेव जयदेव जय श्रीशंकरा। आरती ओवाळु तुज कर्पुर गौरा॥धृ॥
कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा। अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचे उधळण शीतकंठ नीळा। ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा॥२॥
देवी दैत्य सागर मंथन पै केले। त्यामाजी अवचित हलाहल जे उठिले।
ते त्वा असुरपणे प्राशन केले। नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले॥३॥
व्याघ्रांबर फणीवरधर सुंदर मदनारी। पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी। रघुकुळटिळक रामदासा अंतरी॥४॥
(२२४)
[३] सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी। करि डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनी।
कडाडिले ब्रह्मांड धाक त्रिभुवनी। सुरवरनर निशाचर त्या झाल्या पळणी॥१॥
जयदेव जयदेव जय हनुमंता। तुमचेनि प्रसादे न भी कृतांता॥धृ॥
दुमदुमली पाताळे उठला प्रतिशब्द। थरथरला धरणीधर मानिला खेद।
कडकडिले पर्वत उड्डगण उच्छेद। रामी रामदासा शक्तीचा शोध॥३॥

(२२५)

[४] युगे अठ्ठविसी विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा। चरणी वाहे भिमा उद्धरी जगा॥१॥
जयदेव जयदेव जय पांडुरंगा। रखुमाई वल्लभा राहीच्या वल्लभा पाहे जिवलगा॥धृ॥
तुळसीमाळा गळा कर ठेऊनि कटी। कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी।
देव सुरवर नित्य येती भेटी। गरुड हनुमंत पुढे उभे राहाती॥३॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागेमाजि स्नान जे करीती।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ति। केशवासी नामदेव भावे ओवाळिती॥४॥

(२२६)

[५] आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा। सेविती साधुसंत। मनु वेधिला माझा॥धृ॥
लोपले ज्ञान जगी। हित नेणते कोणी। अवतार पांडुरंग। नाव ठेविले ज्ञानी॥२॥
कनकाचे ताट करी। उभ्या गोपिका नारी। नारद तुंबरु। साम गायन करी॥३॥
प्रगट गुह्य बोले। विश्व ब्रह्मचि केले। रामा जनार्दनी। पायी टकचि ठेले॥४॥

(२२७)

[६] आरती तुकारामा। स्वामी सद्गुरूधामा। सच्चिदानंदमुर्ति। पाय दाखवी आम्हा॥धृ॥
राघवे सागरात पाषाण तारिले। तैसे तुकोबाचे अभंग रक्षिले॥२॥
तुकिता तुळणेसी ब्रह्म तुकासी आले। म्हणोनि रामेश्वरे पायी मस्तक ठेविले॥३॥

(२२८)

[७] होता कृपा तुमची पशु बोले वेद। निर्जिव चाले भिंत महिमा अगाध।
भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरी शुद्ध। करुनि भाविक लोका केला निजबोध॥१॥
जयदेव जयदेव जय ज्ञानसिंधु। नामस्मरणे तुमच्या तुटे भवबंधु॥धृ॥
चौदाशे वरुषाचे तप्तीतीर रहिवासी। येऊनि चांगदेव लागती चरणासी।
करुनि कृपा देवे अनुगृरहिले त्यासी। देऊनि आत्मज्ञान केले सहवासी॥३॥
समाधि समयी सकळ समुदाय। घेऊनि सुरवर आले पंढरीराय।
द्वारी अजानवृक्ष सुवर्णपिंपळ असुमाय। जाणोनि महिमा निळा चरणातळी राहे॥४॥

(२२९)

[८] जन्मता पांडुरंगे जिव्हेवरी लिहिले। शतकोटी प्रमाण हे कवित्व रचिले॥१॥
जयजयाजी भक्तराया जिवलगा नामया। आरती ओवाळिता चित्त पालटे काया॥धृ॥
घ्यावया भक्तीसुख पांडुरंग अवतार। करोनिया तीर्थ मिसे केला जगाचा उद्धार॥३॥
प्रत्यक्ष प्रचित हे वाळवंट परीस केले। हरपली विषमता द्वैतबुद्धी निरसली॥४॥
समाधि महाद्वारी श्रीविठ्ठल चरणी। आरती ओवाळितो परिसा कर जोडोनि॥५॥

(२३०)

[९] भानुदासाचे कुळी महाविष्णुचा अवतार। क्षेत्र प्रतिष्ठान वस्ती गोदातीर॥१॥
ओवाळु आरती स्वामी एकनाथा। तुमचे नाम घेता हरे भव भय चिंता॥धृ॥
जनार्दनाची कृपा दत्तात्रयाचा प्रसाद। भागवती टिका नारायण आत्मबोध॥३॥
ब्रह्मा, विष्णु, महेश ज्यासी छळावया येती। न ढळे ज्याची निष्ठा होय एकात्मता भक्ती॥४॥
कावडीने पाणी ज्या घरी चक्रपाणि वाहे। अनन्य भक्ति भावे निळा वंदी त्याचे पाय॥५॥

(२३१)

[१०] प्रपंचरचना सर्वही भोगुनि त्यागिली। अनुतापाचे ज्वाळी देहबुद्धि हविली।
वैराग्याची निष्ठा प्रगटूनि दाखविली। अहंता ममता दवडुनि निजशांति वरिली॥१॥
जयजयाजी सद्गुरु स्वामी तुकया दातारा। तारक तु सकळांचा जीवलग सोयरा॥धृ॥
हरिभक्तिचा महिमा विशेष वाढविला। विरक्ती ज्ञानाचा ठेवा उघडिला।
जगदोद्धारालागी उपाय सुचविला। निंदक दुर्जनांचा संदेह निरसला॥३॥

तेरा दिवस वह्या रक्षुनिया उदकी। कोरड्याचि काढूनि दाखविल्या शेखी।
अपार कविता शक्ति मिरवुनि विधी अंकी। कीर्तन श्रवणे तुमच्या तरिजे जन लोकी॥४॥
बाळवेष घेऊनि श्रीहरि भेटला। विधिचा जनिता तूचि आठव हा दिधला।
तेणे ब्रह्मानंदे प्रेमा रूढविला। न तुके म्हणोनि तुका नामे गौरविला॥५॥
प्रयाणकाळी देवे विमान पाठविले। कलिच्या काळामाजी अद्भुत वर्तले।
मानव देह घेऊनि निजधामा गेले। निळा म्हणे सकळ संता तोषविले॥६॥

उपसंहार

(२३२)

[१] घालीन लोटांगन वंदीन चरण। डोळ्यांनी पाहिन रुप तुझे॥१॥
प्रेमे अलिंगीन अनंत पुजिन। भावे ओवाळीन म्हणे नामा॥२॥

जगद्गुरू श्रीतुकाराम महाराजांचे पसायदान

(२३३)

[२] हेचि सुख पुढती मागतो आगळे। आनंदाची फळे सेवादान॥१॥
जन्मजन्मांतरी तुझाचि अंकिला। करुनि विठ्ठला दासा ठेवी॥धृ॥
दुजा भाव आड यऊ नेदी चित्ता। करावा अनंता नाश त्यांचा॥३॥
अभय देऊनि करावे सादर। क्षण तो विसर पडो नेदी॥४॥
तुका म्हणे आम्ही जे जे इच्छा करु। ते ते कल्पतरु पुरविसी॥५॥

(२३४)

[३] हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास॥१॥
पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरि॥धृ॥
संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा कल्लोळ॥३॥
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान॥४॥

श्रीसंत नामदेवरायांचे पसायदान

(२३५)

[४] आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा। माझिया सकळा हरिचिया दासा॥१॥
कल्पनेचि बाधा न हो कवणे काळी। ही संतमंडळी सुखी असो॥धृ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझ्या विष्णुदासा भाविकांसी॥३॥
नामा म्हणे तया असावे कल्याण। ज्या मुखी निधान पांडुरग॥४॥

(२३६)

[५] मागणे ते एक तुजप्रति आहे। देशी तरी पाहे पांडुरंगा॥१॥
या संतांसी निरवी हेचि मज देई। आणिक दुजे काही न मागे तुज॥धृ॥
तुका म्हणे आता उदार तू होई। मज ठेवी पायी संतांचिया॥३॥

॥ज्ञानदेव तुकाराम ज्ञानदेव तुकाराम ज्ञानदेव तुकाराम॥
॥ तुकाराम तुकाराम तुकाराम॥

॥पसायदान॥

आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। तोषोनि मज द्यावे। पसायदान हे॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भुता परस्परे पडो। मैत्र जीवांचे॥२॥
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसुर्य पाहो। जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात॥३॥
वर्षत सकळमंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भुमंडळी। भेटतु या भुता॥४॥
चला कल्पतरुंचे आरव। चेतना चिंतामणींचे गाव। बोलते जे अर्णव। पीयुषांचे॥५॥
चंद्रमे जे आलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वही सदा सज्जन। सोयरे होतु॥६॥
किंबहुना सर्व सुखी। पुर्ण होऊनि तिही लोकी। भजिजो आदिपुरुखी। अखंडित॥७॥
आणि ग्रंथोपजीविये। विशेषी लोकी इये। दृष्टादृष्ट विजये। होवावे जी॥८॥
तेथ म्हणे श्री विश्वेशरावो। हा होईल दान पसावो। येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला॥९॥

पुंडलिक वरदा हरि विठ्ठल श्रीज्ञानदेव तुकाराम।
पंढरीनाथ भगवान की जय।
माऊली ज्ञानेश्वर महाराज की जय।
भक्तशिरोमणी नामदेव महाराज की जय।
शांतीब्रह्म एकनाथ महाराज की जय।
श्रीमंत श्री जगद्गुरु तुकाराम महाराज की जय।
श्री संत निळोबा महाराज की जय।
पार्वती पतये हर हर हर महादेव।